म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ..... कोटो .....
दा. क्र. ९०८

आली संतांचा मेळा

BVBK-0400907

॥ श्री विठ्ठल प्रसन्न ॥

BVBK-0400907

श्रीकृष्णजयंती
श्रावण व ८, शके १८९७

सज्जनहो,

श्री संत ज्ञानेश्वरांची सातशेवी जयंती साजरी करण्याचं भाग्य आपल्याला लाभलं आहे. ही पर्वणी कोण सोडील !

हा पवित्र सोहळा साजरा करण्यासाठी संत ज्ञानेश्वर आणि इतर संतांच्या कथात्मक जीवनचरित्रांची योजना आम्ही आखली. संत ज्ञानेश्वरांप्रमाणेच नामदेव, गोरोबा, मुक्ताई, विसोबा, चांगदेव, नरहरी, परमा भागवत, जनाबाई, सांवता, राका, चोखोबा, कूर्मदास, जगमित्र नागा, जोगा परमानंद कान्होपात्रा, सेना अशी सारीच संतमंडळी आमच्या योजनेत आली. म्हणूनच म्हटलं **'आला संतांचा मेळा'**

दहा भागांची ही योजना आहे. दहावा भाग 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचा परिचय करून देणारा असून, पहिल्या नऊ भागात ही सारी संतमंडळी जे उदात्त, अलौकिक आणि मंगल जीवन जगली त्याची माहिती गुंफलेली आहे.

हा **पाचवा भाग** आपल्याला **संत गोरोबा** आणि **संत विसोबा** यांची अद्भुत चरित्रे सांगतो.

संत गोरोबाकाका हे संतमंडळींत वयाने जेष्ठ. त्यांचा भक्तिमार्गातला अधिकारही श्रेष्ठ. ज्ञानदेव-नामदेवांच्या काळातही आपल्या भक्तिसामर्थ्याने त्यांनी पंढरीचा परिसर गाजवला. कुंभाराच्या व्यवसायात रमलेल्या या भक्तश्रेष्ठाचे जीवन खरोखर आदर्श होते. त्यांच्या व्यावसायिक आणि प्रापंचिक निष्ठा खऱ्या अर्थाने विठ्ठलभक्तीत कशा बुडून गेल्या होत्या हे पाहूनच मन थक्क होते. त्यांच्या चरित्राचा मथितार्थच सांगायचा तर असे म्हणता येईल की 'एकनिष्ठपणा' हे सर्व प्रयत्नांचे श्रेय आहे. गोरोबाकाकांना म्हणूनच संतमेळ्यातही फार मान होता.

ज्ञानेश्वरादी भावंडांच्या जीवनचरित्राला जे अलौकिकत्व प्राप्त झाले ते त्यांना झालेल्या प्रतिष्ठितांच्या विरोधामुळेच. या विरोधाचे खोटेपण

दाखवून आणि खरेपणाचा आदर्श निर्माण करून दाखविल्यानेच निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, मुक्ताई आणि सोपानदेव यांच्या परमार्थातील अधिकाराची ओळख जनसामान्यांना झाली. त्यांच्यावरचा विश्वास वाढला, तसा खऱ्या ज्ञानाचा, खऱ्या भक्तीचा आणि सद्विचारांचा मार्ग धरून जनसामान्यही धन्य झाले.

विसोबा चाटी हे आळंदीतले असेच एक प्रतिष्ठित !


आळंदी क्षेत्राच्या मोठेपणाने या विसोबांसारख्या धर्मनिष्ठांनाही मोठेपणा प्राप्त झालेला होता. परंपरा, रूढी, कर्मकाण्ड, सामाजिक आचार आणि स्वतःच्या धर्माचारांचे अवडंबर यामुळे ही विसोबांसारखी मंडळी एकप्रकारच्या दांभिक प्रतिष्ठेनं भारावली होती. योग्य वेळी, योग्य ठिकाणी आणि योग्य प्रकारे अशांचा भ्रमनिरास केला तर ही माणसेही खरोखर सन्मार्गी होण्यासारखी आहेत हे ओळखणारा कोणी हवा होता. ज्ञानेश्वरादी भावंडांनी ती जाण दाखविली.

विसोबा चाटी यांनी 'विसोबा खेचर' या पदवीला येऊन संत नामदेवांसारख्या भक्तश्रेष्ठाचे गुरुपद भूषविले. हा चमत्कार नव्हता; हे होतं मर्मज्ञान ! विसोबांना हे कसं गवसलं तेच या चरित्रात वाचायचं आहे.

म्हणून एवढी प्रस्तावना पुरे !

२९ ऑगस्ट १९७५
१९/२७७, लोकमान्यनगर,
पुणे ३०.

[signature]



## 'तुम्हां विठ्ठलाची आण।'

"विठ्ठल, विठ्ठल!!" अंथरुणावर उठून बसता बसता गोरोबा हाताने चुटक्या वाजवीत म्हणाले. त्यांनी शेजारी झोपलेल्या आपल्या छोटया बाळाकडे एकदा प्रेमभराने पाहिले. अंगाला आळोखा देऊन त्यांनी आळस झाडून टाकला. नंतर पलीकडे झोपलेल्या बायकोला ते हाक मारून उठवू लागले.

"संतू–अग ए संती! उठायचं ना. कोंबडा आरवला ग!"

गोरोबा यानंतर न रेंगाळता उठून घराबाहेर आले. त्यांनी खळखळून तोंड धुतले आणि पूर्व दिशेला तोंड करून त्यांनी नमस्कार केला. चटचट आपली नित्य कर्मे आवरून, ते आपल्या उद्योगाला लागले.

तीन चार दिवसावर तेरढोकीचा बाजाराचा दिवस आला होता. त्यामुळे बराच माल तयार करायचा होता. त्यासाठी गोरोबांनी आदल्या दिवशी दहा गाढवे माती घेऊन ठेवली होती

ती चाळून, निसून घ्यायची होती. चाकावरची वाळकी माती काढून टाकायची होती. पाण्याचे रांजण भरून ठेवायचे होते. आवा साफ करून ठेवायचा होता. कितीतरी कामे व्हायची होती. गोरोबा तोंडाने विठ्ठलाचे नाव घेत आपली कामे एकाग्रतेने करू लागले.

* * *

पंढरपुरापासून जवळ असलेल्या तेरढोकीचे गोरोबा कुंभार हे एक निस्सीम विठ्ठलभक्त होते. त्यांची विठ्ठलभक्ती त्या परिसरात चांगलीच माहिती होती. वयाप्रमाणेच ते थोर भक्त म्हणून सर्वांना आदरणीय होते. त्यांनी आपला कुंभाराचा व्यवसाय तसाच नेकीने चालवला होता. त्यांचा माल चोख, काम सुबक आणि दाम माफक असे. पैसा मिळविणे हे त्यांचे ध्येय नव्हतेच मुळी. व्यवसाय करायचा तो कुटुंबाचे नी आपले पोषण करायसाठी, एवढाच त्यांचा मर्यादित दृष्टिकोन होता. साहजिक त्यांना लोक विश्वासाने पैसा देत आणि खात्रीचा माल नेत.

आपल्या व्यवसायात प्रामाणिकपणे वागणारे गोरोबा आपला उरलेला वेळ आवडत्या विठ्ठलभजनात घालवीत. विठ्ठल हे त्यांचे सर्वस्व होते. उठता, बसता, काम करता सतत विठ्ठलाला आळवणे हाच त्यांचा छंद होता. कधी कधी या विठ्ठलनामात ते इतके रंगून जात की त्यांना हातातल्या कामाची, भोवतीच्या माणसांची वा वेळेचीही आठवण राहात नसे. एवढे तल्लीन होऊन गोरोबा नामस्मरण, अभंगपठण करीत असत.

आताही गोरोबा एकीकडे काम करीत होते आणि तोंडाने नामस्मरण करीत होते. मधूनच त्यांना एखादा अभंग स्फुरायचा नी तें मोठ्या आवडीने तो म्हणायचे.

* * *

बाहेर गोरोबांचा उद्योग चालू असतानाच आत संतीही जागी झाली. तिचे बाळ अजून साखरझोपेत होतें.

"चला बाई, बाळ झोपलंय तंवरच कामं व्हायची!" असे संती स्वतःशीच म्हणाली आणि लगबगीने उठून घरकामाला लागली. झाडझूड करण्यापूर्वी तिने स्वतःचे सारे उरकले होते आणि एकाएकी तिला आठवण झाली तशी ती दाराबाहेर डोकावून म्हणाली,

"ऐकलं का हो! दोन चांगले रांजण बाजूला काढून ठिवा. त्या जोशीबाबाकडं द्यायचेत." संती गोरोबाला म्हणाली. पण यावर 'हो', 'नाही' असे काही उत्तर देण्याऐवजी गोरोबा नेहमी-प्रमाणे तोंडाने म्हणत असलेला अभंग फक्त मोठ्याने म्हणू लागले.

संतीचे शब्द गोरोबापर्यंत पोचल्याची ती खूण संतीनें ओळखली. पण हे नेहमीचे ठाऊक असूनही आज कशी कोण जाणे ती थोडी रागावली.

"काय माणसं तरी! निसतं तोंडानं 'हो' म्हणायला अवघड जातंय यांना! कसा हा गाडा निभायचाय काय कळंना!" संती तणतणली.

संतीचं तणतणणं गोरोबांपर्यंत पोचलं पण तरीही त्यांच्या उद्योगात खंड पडला नाही. उलट,

"निर्गुणाचा संग धरिला जो आवडी ।
तेणे केले देशधडी आपणीयासी ।। "

हा अभंगाचा चरण अधिक मोठ्याने म्हणत ते काम करीत राहिले.

संतीनं कपाळाला बोटं टेकवून, एकदा गोरोबांच्याकडे पाहिलं आणि तीं माघारी वळून आपल्या उद्योगाला लागली.

तोंडानं अभंग म्हणत आणि मध्येच 'विठ्ठला, मायबापा' असा जयघोष करीत गोरोबांनी बरंच काम उरकलं. माती चाळन, निसून झाली होती. आता ती कालवायसाठी त्यांनी एकत्र केली होती. मातीच्या ढिगात आळे करून त्यात हळूहळू पाणी ओतायला त्यांनी आरंभ केला.

तेवढ्यात संती कडेवर आणि डोईवर घागरी घेऊन तिथं आली.

"म्हटलं जरा इकडं ध्यान देता का?" संती म्हणाली.

"काय म्हणतीस?" गोरोबांनी विचारलं.

"आत बाळ झोपलंय. मी जोशीबाबांच्या घरी ते रांजण देऊन येत्येय. तोवर जरा बाळाकडं लक्ष द्या." संतीने हातातल्या घागरी खाली ठेवल्या नी बाजूचे दोन रांजण उचलून ती निघून गेली.

गोरोबा पुन्हा आपल्या कामात रंगले. माती कालवून त्यांनी गोळे तयार केले. तोंडाने विठ्ठलाचे नामस्मरण अखंड चालूच होते. तोंडाने नाम आणि हाताने काम ही गोरोबांची नेहमीचीच पद्धती होती.

गोरोबा अशा प्रकारे कामात रंगून गेले असतानाच आत

झोपलेले बाळ जागे झाले. आईचा कानोसा घेत ते रडू लागले. पण त्याला आई भेटली नाही तेंव्हा ते रांगत दाराशी आले.

दाराशी येताच गोरोबांच्या भजनाचे सूर त्याच्या कानी पडले आणि गोरोबांचे लक्ष आपल्याकडे वेधण्यासाठी ते रडू लागले. थोडचा वेळाने गोरोबांनी रडण्याचा आवाज ऐकला. त्यांनी बाळाला घेण्यासाठी हात धुतले आणि दाराशी येऊन बाळाला उचलून घेतले. त्याबरोबर बाळाचे रडे थांबले. मग गोरोबा बाळाला कडेवर घेऊन नाचल्यासारखे करीत भजन म्हणू लागले. बाळाला गंमत वाटली नी ते खळखळून हसले.

काही वेळ गोरोबांनी बाळाला खांद्यावर घेऊन खेळवले आणि त्याचवेळी त्यांना कशी कल्पना सुचली कोण जाणे! पण बाळाला खांद्यावर बसवून आता गोरोबांनी पायाने माती तुडवायला सुरुवात केली.

तेवढचात नेहमीचा पखालजी आला. अंगणात चाललेला तो आनंदाचा सोहळा त्यालाही अपूर्व होता. काही वेळ तो ते दृश्य पाहातच राहिला. त्याच वेळी संतीही परतली. हा पखालजी काय पाहात उभा आहे, हे प्रथम तिच्या लक्षातच येईना. तीही हळूच येऊन पखालजीच्या मागे उभी राहिली. गोरोबा पायाने माती तुडवीत होते. त्या तालावर त्यांचे भजन सुरू होते. खांद्यावरच्या बाळाला हेलकाव्यांचे सुख वाटल्याने तेही सुखावले होते. हसत होते. रंगले होते.

मध्येच बाळाचे लक्ष आईकडे गेले. त्याबरोबर त्याने तिच्याकडे झेप घेण्यासाठी अंग टाकले. संती आणि पखालजी दोघेही घाबरून ओरडले. पण बाळाचा एक हात गोरोबांनी पक्का धर-

लेला असल्याने बाळ पडले मात्र नाही. संती आणि पखालजी यांच्या ओरडयाने बाळ घाबरून रडू लागले.

दोन किंकाळया आणि बाळाचे रडणे यामुळे गोरोबांची भजनसमाधी भंगली. त्यांनी त्रासिकपणे संतीकडे पाहिले. तेवढयात त्यांचे लक्ष पखालजीकडे गेले.

"ये बाबा, वेळेवर आलास. माती भिजवायला पाणीच नव्हते. आणि दुसरी खेप जरा लवकरच आण हं." गोरोबा म्हणाले.

"ठीक आहे. आता आणतो खेप. पण गोरोबा आता तुमचं लेकरूही भजन करणार बरं का! काय रंगून गेलं होतं!" पखालजी पाण्याच्या रांजणात पखाल रिकामी करता करता म्हणाला.

"व्हय. तेवढंच कमी हाय बाबा! आज बाळाला घेतलं एवढंच लई झालं. नाय तर हायच संतीचं कर्म नि ह्यो संसार! हा एवढा गुंता नसता तर मीच गाडून घेतलं असतं या मातीत-- त्या इठ्ठलाच्या नावानं!" संती बाळाला कुरवाळत पण धसफसत म्हणाली.

"काय गोरोबा! काय म्हणतीया कारभारीण?" पखालजीनं विचारलं.

"विठ्ठल--विठ्ठल!" गोरोबा एवढंच म्हणाले.

* * *

गोरोबा आणि संती यांच्यात असे संवाद नेहमीच होत. पखालजी नित्य त्या घरी येणारा, त्यामुळे संतीचे तणतणणे आणि गोरोबांचे शांत राहणे यात त्याला विशेष काहीच वाटले नाही.

गोरोबा काम करीत असोत, मुलाला खेळवीत असोत किंवा आनंद, राग, चीड, कौतुक कोणतीही भावना व्यक्त करीत असोत, सारे काही विठ्ठलाच्या साक्षीनेच होते आहे, अशा भावनेने गोरोबा अखेर 'विठ्ठल--विठ्ठल!' अशा शब्दातच विषयाचा शेवट करीत. आताही तसेच घडले.

गोरोबांच्या 'विठ्ठल' नामाच्या उच्चाराने पखालजी आणि संती दोघांनाही विषय संपला हे समजले आणि ते दोघे आपापल्या उद्योगाला लागले. रिकामी पखाल काखेत मारून पखालजी निघून गेला. संतीने बाळाला कडेवर घेऊन,

"इठ्ठल म्हणं इठ्ठल! चलाऽऽ! बाळाला दू दू घ्याचं ना!" असं म्हणून बाळाला घेऊन घरात गेली.

गोरोबा पुन्हा अभंग म्हणण्यात रंगले.

* * *

संती घरातली आवराआवर करत होती. एकीकडे बाळाला खेळवत होती. बाळाच्या दूधपाण्याचे संपवून नी घरातली कामे उरकून मोकळे व्हायला संतीला बराच वेळ लागला. तोवर गोरोबांनी सगळी माती पाण्यात कालवून गोळे तयार केले होते. आज सकाळपासून संतीने नाही म्हटले तरी त्यांना दोनदा डिवचले होते. 'कारण नसताना ही आपल्या विठ्ठलभक्तीत विघ्न का आणतात?' या विचाराचा पगडा गोरोबांच्या मनावर होता तरीही त्याच्या कामात खंड पडला नव्हता! अखेर अशी मनाची द्विधा अवस्था झाली की गोरोबा देवाचे नाव अधिक तन्मयतेने घेऊ लागत. आताही तसेच झाले.

ओल्या मातीचे गोळे आता एकत्र करून गोरोबांनी त्यात आणखी पाणी ओतले. तो चिखल पायाखाली तुडवून एकजीव करायचा होता. गोरोबा पायांनी चिखल तुडवू लागले. मुखाने आपोआप अभंगवाणी प्रकट होऊ लागली—

**कासयासी बहु घालसी मळण । तुज येणेविण काय काज ।।**
**एकपणे एक एकपणें एक । एकाचे अनेक विस्तारले ।।**

अशा पारमार्थिक ज्ञानाच्या जाणिवेत गोरोबांची एकदा समाधी लागली की त्यांना आजूबाजूचे काही समजत नसे. आता तशाच अवस्थेत ते गेले होते.

मधेच केव्हा तरी संती बाहेर आली. तिने कडेवरच्या बाळाला खाली ठेवले. त्याच्या पुढे चार खेळणी टाकली. थोडे फार बाळाचे लक्ष जेव्हा खेळण्यात गुंतलेले तिने पाहिले तेव्हा तिने अंगणातल्या घागरी उचलल्या—

"बाळ खेळतोय बरं का इथं. मी पाण्याला जाऊन येत्ये. लक्ष ठिवा." संती गोरोबांना उद्देशून बोलली. त्यावेळी गोरोबांना भजनानंदानें एवढे झपाटले होते की आपल्या भजनात व्यत्यय नको हे सांगण्यासाठी त्यांनी हाताने खुणा करूनच संतीला जायला सांगितले. संतीला वाटले आपलें सांगणे त्यांच्या ध्यानी आले नी ती तशीच पाण्याला निघून गेली.

गोरोबा भजनानंदात मग्न होते. बाळ अंगणात खेळत होते. बाळासमोरच्या खेळण्यात एक गडगडणारे खेळणे होते. त्या खेळण्याला बाळाचा हात लागला की खेळणे गडगडत पुढे जाई. बाळाला गंमत वाटे. रांगत पुढे जाऊन बाळ ते खेळणे धरू पाही. पुन्हा ते खेळणे पुढे जाई. असे होता होता बाळ अगदी गोरोबांचे

काम चालू होते तिथवर पोचले. गोरोबांना कशाचेच भान नव्हते ते डोळे मिटून एकतानपणे–

'एकपणें एक एकपणें एक । एकाचें अनेंक विस्तारलें ।।'

या अभंगाचे पठण करीत होते.

बाळ आणखी पुढे आले. गोरोबा अभंग म्हणता म्हणता इतके तल्लीन झाले होते की, पाण्याने माती तुडवण्याच्यावेळी त्यांच्या पायांनाही त्या अभंगाचाच ठेका धरावासा वाटला होता. ते जणू नाचत होते. हळूहळू त्यांच्या पायांची गती वाढत होती–



बाळ आता गोरोबांच्या पायाशी असलेल्या लुसलुशीत मातीत हात घालून खेळू लागले होते–

'एकत्व पाहता शिणले अवधारा । न चुके येरझारा चौऱ्यांशीच्या ।।'

शब्द आणि पायांची गती याबरोबरच गोरोबांचे देहभान विलक्षण वेगाने झेप घेऊ लागले– डोळे गच्च आवळून, ते अभंग गाताना नाचत होते–

बाळ आता प्रत्यक्ष गोरोबांच्या पायाखालच्या चिखलात आले होते. गोरोबांनी माती–चिखलासारखेच बाळही पायाखाली तुडवायला आरंभ केला.

'म्हणे गोरा कुंभार कोणी नाही दुजे ।'

गोरोबांची एकाग्रता इतकी विलक्षण वाढली होती की संती घरी केव्हा आली हे त्यांना समजलेच नाही. त्यांच्या पाया-खाली मातीबरोबर बाळाच्या देहाची मळणी झाली होती, याचेही त्यांना भान नव्हते.

संतीला गोरोबांच्या अवस्थेची जाणीव झाली नाही असे नव्हे. कारण, त्यांच्या अभंग म्हणण्याच्या पद्धतीवरून आणि माती तुडवताना होणाऱ्या हालचालींवरून ते सहज लक्षात येत होते. पण कमरेवर आणि डोकींवर पाण्याच्या घागरी असल्याने संती इकडे तिकडे न पाहता प्रथम घरात गेली. घागरी उतरून ठेवताच तिचे डोळे बाळाला शोधायला भिरभिरू लागले.

तिला बाळ कुठेच दिसेना तेव्हा घाबरी होऊन ती गोरोबां-कडे आली. गोरोबांना संतीने विचारलेला प्रश्न समजायला ते सावध होते कुठे...

'म्हणे गोरा कुंभार कोणी नाही दुजे । विश्वरूप तुझे ।

डोळे मिटून या ओळी आळवून आळवून म्हणत आणि वारंवार हात जोडत गोरोबा माती तुडवत राहिले. आणि--

आणि एकाएकी संतीने हंबरडा फोडला, "बाऽऽळ!"

संतीची किंकाळी इतकी भेदक होती की गोरोबांची भाव-समाधी खाडकन् उतरली. श्रीविठ्ठलाला आनंदमय स्थितीत सतत पाहण्याचे आपले भाग्य दुरावले या कल्पनेने गोरोबा अस्वस्थ झाले. जवळच उभी असलेली संती त्यांच्या दृष्टीस पडली. हिच्या-मुळेच आपला तो अनुपम आनंद दुरावला या जाणिवेने तर त्यांचा तोलच सुटला.

"माझ्या विठ्ठलापासून मला दूर करणाऱ्या चांडाळणी थांब तुलाच..." असे म्हणत गोरोबांनी शेजारी पडलेला चाकाचा दांडा उचलला नी ते संतीवर धावून गेले.

संती घाबरून दूर सरली. पळालीच म्हणायची. तरीही गोरोबांना चढलेला आवेग ओसरला नाही. ते तसेच संतीच्या मागे धावले. "माझ्या विठोबापासून मला तोडतेस काय?" असे म्हणत ते संतीला मारण्यासाठी धावले. तेवढ्यात संतीला युक्ती सुचली.

"थांबा. एक पाऊल उचलू नका." संती ओरडून म्हणाली, "माझ्या अंगाला बोट लावाल तर तुम्हाला विठोबाची आण आहे!"

गोरोबा एखाद्या चित्रासारखे जागच्या जागी खिळून राहिले. "विठोबाची आण घातलीस तू मला!" गोरोबांच्या हातातून चक्रदंड सुटून खाली पडला. त्यांचे हात जोडले गेले.

"विठ्ठला, पांडुरंगा!" असे म्हणत त्यांनी जोडलेले हात डोक्याशी नेले नी डोळे मिटून ते विठ्ठलनामाचे स्मरण करू लागले.

"आता कशाला विठ्ठल नी पांडुरंग करताय! माझं सोन्या-सारखं पोर मारलंत त्या पांड्याच्या नावानं! कुठं फेडाल हे

पाप?"- संती एवढे बोलून मातीच्या ढिगाऱ्यावर कोसळली आणि ओक्साबोक्सी रडू लागली.

"मी-मी पोर...!" गोरोबांना आता कुठे परिस्थिती समजून आली. आपण चिखल तुडवताना बाळ तुडवले ही गोष्ट ध्यानी येताच त्यांनाही भडभडून आले.

"देवा, पांडुरंगा का रे माझ्याकडून हे घोर कर्म करविलंस? पण तुझा यातही काही हेतू असेलच की! विठ्ठलाऽऽ! पांडुरंगा!" गोरोबांच्या डोळ्यातून घळघळ घळघळ आसवे ओघळत होती.

'आपल्या हातून आपल्याच मुलाचा घात व्हावा यापरते अघटित काय? विठ्ठलाच्या नावाशिवाय अन्य कशावरही निष्ठा नसलेल्या आपल्या नशिबात हे विपरीत का? संसार, संती, बाळ यांच्यामध्ये आपले मन अधिक गुरफटले होते म्हणून ही शिक्षा तर आपल्याला झाली नाही ना?' अशा एक ना अनेक शंकांनी गोरोबांचे मन गोंधळून गेले होते. पण--!

पण--! एकाएकी गोरोबांचे मन सावरले.

आपण बाळाची हत्या केली. संतीने दूषण दिले. आपण रागावलो. संतीला मारायला धावलो. संतीने आण घातली 'विठ्ठलाची!' सतीच्या अंगालाही स्पर्श न करण्यासाठी घातली गेलेली ही 'विठ्ठलाची आण' म्हणजे आपल्याला संसारापासून भक्तिमार्गाकडे नेणारी आज्ञाच! गोरोबांच्या मनात अशातऱ्हेचे विचार बळावू लागले. त्यांच्या विठ्ठलभक्तीला हा मोठाच आधार वाटला!

पण तरीही मधून मधून लहानग्या बाळाच्या आठवणीने गोरोबा दु:खी होत. बाळाची आठवण झाली, त्याचा शेवट आपल्या

हातून झाला हे त्यांना आठवले की नकळत त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागत--अश्रू--डोळ्यातले पाणी!

एखाद्या झाडाच्या मुळाला पाणी मिळाले की ते जसे तरारून वाढते तसे गोरोबांच्या डोळ्यातून ओघळणाऱ्या आसवांचे पाणी त्यांच्या मनातली विठ्ठलभक्ती तरारून आणायला कारणीभूत झाले.

बाळाच्या मरणाने आधीच काहीसे संसारापासून दूर गेलेले गोरोबा अधिकच विरक्त बनले. आता अखंड विठ्ठलनामाचा जयघोष करीत ते प्राप्त कर्म उरकत होते. त्यांचे कशातच लक्ष लागत नव्हते.

संती तर त्या दिवसापासून अनेक दिवस दुःख आणि उद्वेग यांनी ग्रस्तच होती. अबोल, निराश, दुःखी संतीकडे पाहून सगळ्यांची मने हेलावून जात. पण यावर इलाज नव्हता. काळच दुःखावरचे औषध!

काही दिवसांनी मन आवरून आणि शेजारपाजाऱ्यांच्या प्रेमळ समजावणीला मान देऊन संतीने दुःख गिळले. पुन्हा नव्या उमेदीने ती संसार करू लागली. पण एक नवेच प्रश्नचिन्ह उभे राहिले--

संतीशी प्रेमाने बोलून, तिचे दुःख कमी व्हावे म्हणून तिची समजावणी करून आपले नेहमीचे काम नेमाने करून गोरोबांनी स्वतःचे दुःख मागे टाकले होते. संतीला गोरोबांचा आधार वाटू लागला. तिने पुन्हा उभारी धरली नि संसारात लक्ष घालू लागली. त्यावेळी एक गोष्ट तिला धक्का देऊन गेली. संतीने गोरोबांचा मार चुकविण्यासाठी जी विठ्ठलाची शपथ घातली होती. त्या शपथेला जागून गोरोबा संतीला स्पर्श करण्याचे मात्र कटाक्षाने


टाळत होते. संतीच्या हातून एखादी वस्तू घ्यायची झाली तरी हाताचा स्पर्श टाळून ती गोरोबा घेत.

"विठ्ठलाची आण मला पाळलीच पाहिजे!" असे सांगून गोरोबा संतीशी वागू लागले. हे प्रश्नचिन्ह सोडवण्याचा उपायच संतीला सापडेना.

एका दुःखातून संती सावरली खरी पण हे एक नवेच दुःख तिच्या वाट्याला आले होते. समजावणी, विनवणी, त्रागा, धमकी कशाचाही उपयोग गोरोबांच्या संबंधात होणार नाही हे ती पुरे-पूर ओळखून होती.

अशानं एकाच घरात, संसारात, व्यवहारात कसं निभणार?

संती विचार करून थकत होती. गोरोबा विठ्ठलभक्तीत जास्त जास्त गुरफटत होते.



## 'दोघींना सारखं वागवा।'

गोरोबा आता पांडुरंगाच्या भजन-पूजनात रमून गेले होते. परंतु संती मात्र उदासवाणे जीवन जगत होती. गोरोबांची समजूत घालण्याचा तिने परोपरीने प्रयत्न केला पण व्यर्थ!

आपल्या संसाराची ही आपणच केलेली दुर्दशा तिला असह्य झाली होती. पुत्रवियोगाचे दुःख कालांतराने मागे पडले, पण संसारात आलेल्या या कायमच्या विघ्नाचा इलाज करणे कसे शक्य होते? विचार करकरून संती अधिकाधिक उदास झाली. पण गोरोबांची मनःशांती रेसभरही ढळली नाही जे जे होतंय ते विठ्ठलाच्या मर्जीनुसार होतंय असा त्यांचा दृढविश्वास होता.

अशीच एकदा संती विचार करत बसली असताना, तिच्या माहेरच्या गावाहून कोणी माणूस आला. संतीच्या वडिलांनी तिला एकदा तिकडे बोलावल्याचा निरोप त्याने आणला होता. पाहुणचार घेऊन तो माणूस गेला. संतीने गोरोबांना वडिलांच्या निरोपासंबंधी सांगितले गोरोबांनीही सासऱ्याची आस्थेने चौकशी केली आणि संतीबरोबर तिच्या गावी जायलाही ते कबूल झाले.

* * *

संतीच्या वडिलांची प्रकृती बरी नव्हती. त्यातून संतीच्या

पाठची बहीण रामी हिचे अजून लग्न व्हायचे होते. त्या काळजी-नेहीं त्यांचा जीव तळमळत होता. वय, प्रकृती आणि मुलीच्या लग्नाची काळजी यांनी त्रस्त झालेल्या त्यांच्या जीवाला गोरोबा आणि संती यांच्या भेटीने पुष्कळ बरे वाटले. गोरोबांच्या विठ्ठल-भक्तीचे त्यांना कौतुक होते. गोरोबांच्या सात्त्विकतेचा त्यांना अभिमान होता.

संतीच्या वडिलांनी संतीजवळ आपले दु:ख सांगितले आणि तिनेही मोठ्या प्रेमाने वडिलांना रामीच्या लग्नाविषयी निष्काळजी राहायला सांगितले. हे सांगता सांगता तिने एक निराळाच मुद्दा मांडला.

"मी म्हणते बाबा, रामीचं लगीन आमच्या ह्यांच्याशीच केले तर! नाही तरी मी आता काय नावाचीच बायको!"

"काय म्हणतीस काय संतू! गोरोबा मानतील हे" वडिलांनी प्रश्न केला. गोरोबा आणि संती यांच्यामध्ये विठोबाच्या शपथेने निर्माण केलेला घोटाळा त्यांना माहिती होता तरी ते साशंक होते.

"शिवाय माझ्याच एक मुलीच्या संसारात मीच सवत घालू?" संतीच्या वडिलांनी व्यावहारिक अडचण सरळ पुढे केली.

"सवत? सवत नाही पाठची बहीण आहे ती माझी. आम्ही दोघी बहिणीसारख्या एकत्र नांदू. कुठून तरी आमचा वंशवेल वाढला म्हणजे मी सुखी होईन. माझं ऐका तुम्ही बाबा!" संती कळवळ्याने म्हणाली.

"यापुढं मी तरी काय बोलणार. पाहा प्रयत्न करून. माझं म्हाताऱ्याचं काय–सुखी व्हा म्हणजे झालं!" वडिलांनी म्हटले.

या नंतर संतीने थोडी उभारी धरली. प्रथम गोरोबांशी

गोडीने बोलून तिने त्यांना वंशाच्या वाढीचा, नांदत्या घराचा, स्वतःच्या हिताचा, रामीच्या सुखाचा असा सगळा विचार पटवला.

मुलाच्या प्रेमाने आणि वर विठ्ठलाच्या शपथेच्या प्रकाराने दुःखी झालेल्या संतीला खरोखरीच सुख लाभत असेल तर विठ्ठलाची आज्ञा म्हणून आपण ही गोष्ट कबूल करावी असा विचार करून गोरोबांनी आपल्या मनाने विठोबाचा कौल घेतला. त्यांच्या मनाला प्रामाणिक विचारांती हे पटले की सासरा, बायको अशा सर्वांनाच सुख होणार असेल तर आपण त्यांच्या सुखाआड का यावे? गोरोबांनी संमती दिली.

गोरोबा आणि संती यांच्याविषयी रामीला प्रथमपासूनच प्रेम होते. तिचे मन वळवायला संतीला फारसे कष्ट पडले नाहीत.

यापुढील कामे करण्यात फारशा अडचणी नव्हत्याच. संतीने पुढाकार घेऊन लग्नाची तयारी केली. लोकांनी साथ दिली. गोरोबा पहिल्या प्रमाणेच विरक्तपणे सारे पाहात राहिले.

गोरोबा आणि रामी यांचे लग्न झाले. संतीच्या वडिलांची काळजी संपली. संतीच्या मनात सुखी संसाराची आशा निर्माण झाली. आता वऱ्हाडी मंडळी तेरढोकीला जायला उत्सुक झाली.

संतीचे वडील भरल्या गळ्याने गोरोबांना निरोप देताना म्हणाले, "गोरोबा, तुम्ही देवमाणूस आहात. मी आपल्याला सांगायला नको. पण माझं बापाचं मन राहात नाही म्हणून सांगतो. राग मानू नका."

"छे: छे:! राग कसला. आपण बोला. विठ्ठल करणारा समर्थ आहे." गोरोबा नम्रपणे बोलले.

"आपण माझ्या डोकीवरचा मोठाच भार उतरला आहे.

माझी जशी संती तशी रामी! आता दोघींनाही मी तुमच्या हवाली करतोय. दोघींना सारखीच माया द्या. दोघींना आता तुमचाच आधार आहे." बोलता बोलता सासऱ्याचा गळा दाटून आलेला पाहताच गोरोबा म्हणाले,

"आपण व्यर्थ शीण करता आहात. विठ्ठलाच्या कृपेनं सारं ठीक होईल."

'होईल होईल! पण सांगायचं म्हणून सांगतो. विठ्ठलाची आण समजा नी दोघींना सारखेपणानं वागवा. रामी माझी लहान आहे. चुकलीमाकली तर सांभाळून घ्या!' पुढे बोलवेना म्हणून संती, रामीच्या पाठीवरून हात फिरवीत वडिलांनी डोळ्यात आलेली आसवे मोकळेपणाने वाहू दिली. गोरोबांनी 'तसंच होईल!' असे आश्वासन दिले.

संती आणि रामी वडिलांचा शोक पाहून गहिवरल्या. हा निरोपाचा प्रसंग संपला. गोरोबा दोघी बायकांना घेऊन तेरढोकीला परतले.

*     *     *

तेरढोकीला परतल्यानंतर पुन्हा गोरोबांचा नित्यक्रम सुरू झाला. 'मुखी नाम हाती काम' या पद्धतीत पुन्हा गोरोबांचा दिनक्रम संपू लागला–

संतीला आता नव्याने उत्साह वाटू लागला होता. रामी या घरात आली आहे, ती या घरात पुन्हा चैतन्य आणील असा तिला विश्वास वाटत होता. काही दिवस संती त्या उत्साहातच वावरत होती. पण असे काही दिवस गेल्यावर तिने हळूच रामीकडे

चौकशी केली तेव्हा तिला विपरीत ऐकायला मिळाले...

रामी किती झाले तरी नवी नवरी होती. गोरोबांचा स्वभाव, त्यांचं मन समजून घ्यायला काही दिवस जायला हवेत या दृष्टीने ती जपून जपून वागत होती. शिवाय संतीबरोबर संसार केलेला हा माणूस एकाएकी आपल्याशी तसाच मोकळेपणाने वागू शकणार नाही अशी तिने आपल्या मनाची समजूत घालून घेतली होती. पण एकंदरीत गोरोबा वेगळेच वागताहेत एवढे तिच्याही लक्षात आले होते.

संतीने रामीकडे चौकशी केली तेव्हा तक्रारीच्या सुरात नाही पण आश्चर्याच्या भावनेने रामीने आपले मन संतीजवळ मोकळे केले. आता संती खरीच गोंधळली. संधी पाहून तिने यासंबंधी गोरोबांजवळ विषय काढला. पण गोरोबा न गोंधळता म्हणाले,

"संतू, अग विठ्ठलाची आण घालून तुम्हीच मला सांगता नी पुन्हा मी शपथ पाळली म्हणून तुम्हीच गोंधळता हे असं कस?"

"विठ्ठलाची आण घालून मी फशी पडले खरी! माझं चुकलं. पण धनी, त्या बिचाऱ्या रामीला का वनवास? तिनं काय केलंय?" संतीनं गोरोबांना कळवळून विचारलं.

"विठ्ठल, विठ्ठल! संतू जरा शांत हो. मी काय म्हणतोय नीट ऐक. मग मला बोल लाव" गोरोबा म्हणाले, "रामी ऽ अग रामी!"

रामी संतीच्या सूचनेवरून आत थांबली होती. हाक ऐकून ती बाहेर आली. अदबीने संतीजवळ बसली.

"संती, रामी, मी विठ्ठलाची भक्ती करतो. माझ्या जीवनात त्या एका पतितपावना खेरीज मी अन्य काही मानत नाही.

तरी मीं माझा संसार नि माझा कुलालाचा धंदा आळस न करता सांभाळलाय. कुणाला दुःख व्हावं किंवा द्यावं असं मी चुकूनही काही आपणहून करीत नाही. त्यातून जर तसं काही घडलंच तर ती विठ्ठलाची मर्जी! आता बोला!" गोरोबा म्हणाले.

"हे जर खरं, तर तर धनी आपण माझ्यासारखंच रामीलाही दुःखी का ठेवता. तिचा हातसुद्धा तुम्ही लावून घेत नाही असं का?" संतीनं सरळच प्रश्न केला.

"त्याला कारण रामीच्या वडिलांना मी दिलेला शब्द!" गोरोबा.

"काय!" संती आणि रामी आश्चर्याने एकदमच म्हणाल्या.

'होय. 'विठ्ठलाची आण समजा नि दोघींना सारखेपणानं वागवा' अशी त्यांनी मला आज्ञा केली आहे नि मी ती आज्ञा विठ्ठला शपथ नीट पाळतो आहे." गोरोबा हात जोडून, डोळे मिटून, बोलले.

"अरे देवा ऽ! आता काय करावं या कर्माला!" रामी म्हणाली.

"जिथं तिथं हा काळतोंड्या आडवा येतोय तर!" संती तिथून तरातरा उठून जाता जाता म्हणाली. रामी तिच्या पाठोपाठ निघून गेली.

"विठ्ठला–पांडुरंगा!" गोरोबांनी शांतपणे नाव घेतले.

* * *

संती आता खूप चिडली होती. तिच्या संसारावर आलेले संकट विसरून, तिने निदान गोरोबांचा वंशवेल वाढावा, गोरोबांच्या घरात चैतन्य यावे, म्हणून रामीला सवत करून घरात आणले. आता गोरोबा त्या विठ्ठलाच्या नावाने तिच्याही संसा-

राचा विस्कट करायला लागले आहेत यामुळे ती खूप खूप रागावली होती.

नवेपणाने संसाराला लागलेली, नवऱ्याच्या घरी येणाऱ्या मुलीच्या मनानं काही सुखाची चित्रे पाहिलेली रामी तर निराशेच्या खोल खाईतच पडली होती. तीही तशी मनातून संतापलेलीच होती.

अखेर ह्या दोन चिडलेल्या बायका एकविचाराने काहीतरी करायचे ठरवू लागल्या. गोरोबांना कुणाकडून समजावून सांगण्याचा प्रयत्न करावा तर माणूस कोण? मनधरणी, पाया पडणे, लाडीगोडी हेही प्रयत्न गोरोबांपुढे टिकणारे नव्हेत! मग आता काय करायचे?? नाटकीपणा करून, किंवा फसवून जर गोरोबांची शपथ मोडली तर! तर कशाला? प्रयत्नच करून पाहू! व्हायचे असेल ते होईल! त्या दोघींच्या मनात असा विचार कायम झाला आणि...

आणि एका रात्री दोघीजणी घरात झोपल्याचे दाखवून, गोरोबांची चाहूल घेत राहिल्या. रात्रीचा कामधंदा बंद झाल्यावर शांत वेळी गोरोबा आपले विठ्ठलनामाचे व्रत नित्यनेमाने चालवीत. काही वाचावे, काही रचावे, काही म्हणावे असा त्यांचा क्रम असे. त्यारात्री गोरोबा आपले स्मरण, पठण, नामसंकीर्तन आटोपून मोकळे झाले. मग उशीरा त्यांनी अंथरूणावर अंग टाकले. खूप वेळाने त्यांना झोप लागली.

संतीने उठून येऊन गोरोबांना झोप लागल्याची खात्री करून घेतली. पुन्हा रामीनेही आपल्या परीने खात्री करून घेतली. मग दोघींनी धडधडत्या अंत:करणाने गोरोबांच्या अंथरूणाजवळ बैठक मारली. गोरोबांना स्पर्श करताना त्यांचे हात कापत होते. पण धैर्य एकवटून दोघींनी गोरोबांचे हात पकडले, नी घट्ट धरून ठेवले.

या प्रकारात जबरदस्तीही होती नी भीतीही होती. पण एकदाचा सोक्षमोक्ष लावण्याच्या निर्धाराने दोघींनी हे धाडस केले होते.

गोरोबांची झोप उडाली. डोळे उघडताच त्यांना संती नी रामी शेजारी दिसल्या. आपले हात दोघींच्या हातात असल्याचे जाणवताच गोरोबा चमकले. हात हिसडून ते उठून बसले.

"विठ्ठलाऽऽ! मायबापा! का रे लेकराचा अंत पाहिलास!" विव्हळून एवढे बोलत गोरोबा अक्षरशः डोळ्यातून पाणी गाळू लागले.

"देवा, तुझी शपथ मोडली! या–या हातांनी सारं पुण्य नासवलं! मो--माझे हात--विठ्ठला चुकलो. क्षमा कर!" गोरोबा असे पुटपुटत तिरीमिरीनं घरातून बाहेर आले.

संती आणि रामी एकीकडे आपल्या कृतीने निर्माण केलेल्या घटनेचे कुतूहल आणि दुसरीकडे गोरोबा आता काय करतात ते समजून घेण्याची उत्कंठा, अशा द्विधा मनःस्थितीत बसून राहिल्या होत्या. गोरोबा उठून बाहेर गेले तरी त्या दोघी एकमेकींकडे पहात तशाच बसून होत्या. आणि--

आणि एकाएकी त्यांना चमत्कारिक आवाजात विव्हळणे ऐकू आले. तशा त्या चमकून उभ्या राहिल्या आणि दाराकडे धावल्या--

गोरोबा बाहेर आले आणि त्यांनी लाकडाच्या ढलप्यांशेजारी पडलेला कोयता घेऊन दोन लाकडांत तो ठेवला. क्षणमात्र ते उभे राहिले आणि त्यांनी कचाकच आपले दोन्ही हात कोयत्याच्या धारेवर फिरवून तोडून टाकले. अखेरीस त्यांच्या तोंडून एक बारीक किंकाळी बाहेर पडली. किंकाळी बाहेर पडताना तिला गोरोबा

आवरू पाहात होते. त्यामुळेच त्या किंकाळीला चमत्कारिक विव्हळण्याचे स्वरूप आले होते. ती विव्हळणे ऐकूनच संतो आणि रामी बाहेर धावून आल्या होत्या.



रक्ताच्या धारा लागलेले गोरोबांचे हात पाहून दोघीही भयानक आवाजात ओरडल्या. रात्रीच्या शांत वेळी त्यांच्या किंकाळ्या घुमल्या. शेजारपाजारचे लोक धावून आले. जाणकारांनी हळद-चुना भरून रक्त थांबवण्याचा प्रयत्न चालू केला. काही जण गावच्या वैद्याकडे धावले काही बायकांनी संतो आणि रामी दोघी बेशुद्ध पडल्या होत्या, त्यांची शुश्रुषा सुरू केली.

गोरोबा संथ आवाजात, वेदनांना साथ देत, विठ्ठलनामाचा

जप करीत होते. काही वेळाने, रक्त वाहिल्याने आलेल्या अशक्तपणाची त्यांना ग्लानी आली. पण त्यांचे नामजपाचे काम थांबले नाही.

'करायला गेलो एक आणि झाले भलतेच' अशा भावनेने संती आणि रामी ओशाळल्या होत्या. गोरोबांना तोंड दाखवतांना त्यांना फार लाजल्यासारखे होत होते. पण गोरोबा मात्र निश्चित मनाने पूर्वीसारखेच शांतपणे विठ्ठलाचे नामस्मरण करीत दिवस संपवत होते. त्यांच्याकडे पाहून संती आणि रामी आश्चर्य करीत होत्या.

आता त्यांना केल्या कृत्याचा पश्चात्ताप होत होता. त्यांनी गोरोबांकडे क्षमा याचना केली; विठ्ठलाला मनातल्या मनात गाऱ्हाणे घातले. आता त्यांनाही विठ्ठलाविषयी प्रेम वाटू लागले होते.

"आम्ही चुकलो!" दोघी म्हणाल्या.

"तुम्ही काय नी आम्ही काय! आपण सारेच काहीतरी चुकलो असू म्हणून पांडुरंगाने आपली परीक्षा पाहिली. तोच करणारा नी तोच तारणारा! आपण केवळ निमित्तमात्र असतो" गोरोबा म्हणाले.

"पण आता काय हो करायचं?" संतीने काहीतरी प्रश्न केला.

"काही करायचं नाही. विठ्ठलावर सारा भरिभार टाकून स्वस्थ राहायचं. तो ठेवील तसं राहायचं. सगळं काही ठीक होईल" गोरोबा शांतपणे उत्तर देत होते.

"मग एक डाव पंढरीला तरी जाऊ. प्रत्यक्ष पांडुरंगालाच गाऱ्हाणं सांगू." रामी म्हणाली.

"गाऱ्हाणं सांगायला काही नाही पण पंढरीनाथाच्या दर्शनाला जाऊं हवं तर!" गोरोबांनी आपला विचार मांडला.

"खरंच जाऊ या!" संतीने रुकार भरला.

यानंतर घराची व्यवस्था लावून तेरढोकीहून गोरोबा आपल्या बायकांना बरोबर घेऊन पंढरीला जायला निघाले. आतापर्यंत गोरोबांच्या विठ्ठलभक्तीची ख्याती सर्वत्र पसरली होती. त्यांच्याबरोबर मग तेरढोकीचे आणखी काही लोकही पंढरपूरला निघाले. वाटेवरच्या गावातून असेच आणखी काही मिळाले.

आता गोरोबांचा उल्लेख संत गोरोबाकाका म्हणूनच केला जाऊ लागला. बरोबर हा मोठा जमाव घेऊन संत गोरोबाकाका पंढरीची वाटचाल करू लागले.



## 'हात फुटले–टाळी वाजली'

गोरोबाकाकांच्या बरोबर पंढरपुराकडे चाललेली मंडळी मोठ्या उत्साहाने विठ्ठलनामाचा जयजयकार करीत वाट चालत होती. आजवर विठ्ठलाच्या नावाचा तिटकारा करणारी संतीही आता गोरोबांच्या संतत्वाला मानून विठ्ठलाचे नाव मोठ्या आवडीने घेऊ लागली होती. गोरोबा तर जणू विठ्ठलमयच झाले होते. मधून मधून गोरोबा उत्स्फूर्तपणे अभंग म्हणत होते. विठ्ठलाच्या भेटीची अपार ओढ त्यांना लागली होती.

**'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे**
**तव झाली प्रसंगी गुणातीत'**

असा एखादा अभंग मोठ्या तन्मयतेने गोरोबा म्हणत आणि मग सारेजण एकसुरात उल्हासाने 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठऽऽल' असा जयजयकार करीत त्या सर्वांच्या मनात आणि शरीरात अपूर्व उत्साह संचारला होता.

पंढरीची वाट संपत होती. जवळ आलेल्या आषाढी एकादशीची पर्वणी सहज साधली जाईल याचाही आनंद सर्वांना झाला होता. त्या आनंदात वाटचालीचे श्रम विसरले जात होते.

वाटेत एखादा कोणी पंढरीकडून येणारा भेटे. त्याच्याकडून

पंढरपूरला आषाढीच्या यात्रेसाठी जमलेल्या मंडळींची माहिती मिळे. यावेळी निवृत्ती, ज्ञानदेव, मुक्ताई पंढरीला आल्याचे समजले म्हणजे त्यांच्या दर्शनासाठी ही मंडळी उत्सुक होई आणि वाटचालीला अधिक गती येई.

अखेर पंढरी नजरेच्या टप्प्यात आली. गोरोबांनी तर आनंदाच्या अतिरेकाने स्वतःला भुईवर लोटून दिले. इतरांनीही त्यांचे सरळ अनुकरण केले. आता मंडळी थेट चंद्रभागेकडे निघाली.

* * *

संत गोरोबाकाका पंढरीत आले असल्याची वार्ता पसरली. पंढरपुरात जमलेल्या संतांच्या कानी ही वार्ता गेली. एकमेकांच्या भेटीची उत्कंठा त्यांच्या मनात उचंबळून आली. गोरोबांनी चंद्रभागेमध्ये स्नान केले नी ते संती आणि रामी यांना घेऊन विठ्ठलाच्या दर्शनाला गेले. देवापुढे जाताना महाद्वारापासूनच गोरोबा वारंवार साष्टांग दंडवत घालत होते. आता ते मनाने विठ्ठलाशी एकरूप झाले होते.

'केशवाचे भेटी लागलेसे पिसे । विसरलो कैसे देहभावा ।।
जाहली झडपणी जाहली झडपणी । संचरले मनी रूप आधी ।। "

अशा अवस्थेत त्यांनी विठ्ठलाचे दर्शन घेतले. डोळे पाहात असलेले विठ्ठलाचे रूप मनात साठवून घेता घेता गोरोबा तन्मय झाले. त्यांच्या ठायी जणू विठ्ठल संचरला!

तशाच विठ्ठलमय झालेल्या मनाच्या अवस्थेत मग गोरोबा संतदर्शनासाठी निघाले. संतांना संतांची ओळख मनोमन होते. पटते. ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादी संतांना गोरोबांच्या भेटीचा आनंद

झाला. सारेजण एकमेकांना एका वेगळ्या पातळीवर भेटले.

नंतर गरुडपारावर नामदेवांचे कीर्तन झाले. ज्ञानदेवादी संत मंडळींबरोबर संत गोरोबाही कीर्तन ऐकायला बसले होते. कीर्तन ऐन भरात आले. सारे तन्मय झाले. गोरोबाही तल्लीन झाले होते.

कीर्तनाच्या ओघात मधून मधून 'विठ्ठल' नामाचा जय-जयकार होत असे. सारा समाज हाताने टाळी वाजवून साथ देई. भावनेच्या भरात गोरोबाही तोंडाने विठ्ठलनामाचा जयघोष करून, टाळी वाजवण्याच्या आवेशात आपले थोटे हात उभारीत पण त्या हातांनी टाळी वाजणार कशी?

गोरोबांना दुःख होई. डोळे आसवांनी भरून येत. मग ते मनातल्या मनात म्हणत,

**"का गे केशिराजा मोकलीले माते ।**
**शरण मी कोणाते जाऊ आता ॥**
**आता माझी लाज राखे पंढरीनाथा ।**
**तुजवीण अनंता आणिक नाही ॥**
**अनाथांचा नाथ दीनांचा कैवारी ।**
**पाव झडकरी आपुल्या दासा ॥ "**

अशा शब्दात ते विठ्ठलाचा धावा करीत.

कीर्तनात पुन्हा पुन्हा टाळीची जागा येई. पुन्हा पुन्हा गोरोबा हात उंचावीत. विषण्ण होत. धावा करीत. असे होता होता एके प्रसंगी गोरोबांना आपल्या भोवतीच्या परिस्थितीचा विसर पडला. ते थरथर कापू लागले. तोंडाने 'विठ्ठल, विठ्ठल, जय हरि विठ्ठल' असा नामजप अखंड चालू राहिला. अवचित गोरोबांच्या

थोटचा हातात त्यांना सळसळ जाणवली. त्यांनी हात उंच केले. आणि काय आश्चर्य गोरोबांच्या थोटचा हातांना पुढचे हात फुटले हा चम-



त्कार घडला तेव्हा गोरोबा घट्ट डोळे मिटून बसले होते पण त्यांच्या मिटल्या डोळयांसमोर होते सगुण सावळे विठ्ठल–रुक्मिणीचे रूप!

गोरोबांच्या त्या अवस्थेत सामान्यांना शिरता येणे शक्यच नव्हते. त्यांना दिसला फक्त चमत्कार! गोरोबांचे नवे हात! पण तेथे असलेल्या संतांना गोरोबांची अवस्था समजली. त्यांनी ओळ-खले की आता गोरोबा एका वेगळयाच आनंदाचा अनुभव करत आहेत! संतांनी गोरोबांच्या अवस्थेला साथ म्हणून अखंड विठ्ठल-नामाचा गजर चालू ठेवला.

"गोरोबांना असं काय झालंय?" या कल्पनेने बावरलेल्या संतूने त्यांना घट्ट धरून ठेवले. त्यामुळे तिच्याही देहात एक अपूर्व शिरशिरी निर्माण झाली. तिच्या मनानेही ठाव सोडला आणि तीही बेभान झाली. तिला डोळ्यासमोर विठ्ठल–रखुमाईची रूपे दिसू लागली. आपोआप तीही विठ्ठलनाम घेऊ लागली.

तो सारा समाजच भक्तीच्या आनंदात न्हाऊन निघाला. थोटा गोरोबा आता पूर्वीसारखे हात असलेला झाला या चमत्काराचा परिणाम नमस्कारात झाला. साऱ्यांनी एकसुरात संत गोरोबाकाकांचा जयजयकार केला. विठ्ठलाच्या नामघोषाने अवघी पंढरी दुमदुमली.

याचवेळी संतीने प्रार्थना केली,

"विठ्ठला मायबापा, तू तुझ्या भक्ताचे तुटलेले हात जोडून त्याला भजनाची संधी प्राप्त करून दिलीस. आमचं चुकलं असलं तरी आमचे अपराध पोटात घाल. आमचं लेकरू आम्हाला भेटव. तुझ्या भजनाची गोडी अखंड राहू दे!"

संतीने केलेल्या प्रार्थनेमागची उपरती आणि तळमळ लक्षात घेऊन रखुमाई प्रसन्न झाली. तिने गोरोबा–संतीचे बाळ त्यांच्याकडे पाठवले. रांगत रांगत येणाऱ्या बाळाकडे पाहून संती हरखून गेली. तिने चटकन् जाऊन बाळाला उचलून कडेवर घेतले. पटापट ती बाळाचे मुके घेऊ लागली.

"विठ्ठला–विठ्ठला!" असा उच्चार करीत संती बाळाला सारखी कुरवाळत होती. ती बाळाला घेऊन गोरोबांकडे धावली.

दोघांनी भक्तिभावानें विठ्ठल--रखुमाईला साष्टांग दंडवत घातले.

विठ्ठल-रखुमाई प्रसन्न झाली. त्यांनी गोरोबा-संतीला आशीर्वाद दिला. शपथ सुटल्याचे सांगितले.

"गोरोबा, आता दोन्ही स्त्रियांचा स्वीकार करून सुखानं संसार करा. संती, रामी तुमचंही गोरोबाच्या भक्तीला सहाय्य असू द्या!"

विठ्ठल-रखुमाईची आज्ञा मान्य करताना सर्वांनी पुन्हा एकदा नम्रपणे दंडवत घातले.

गोरोबा भानावर आले तेव्हा त्यांच्या कानावर त्यांच्या आवडत्या विठ्ठलाचा जयजयकार पडला. तेही दोन्ही हातांनी टाळ्या पिटत त्या जयजयकारात सहभागी झाले.

ज्ञानेश्वर, नामदेवांना गोरोबांचा अधिकार समजला. त्यांनी प्रेमभराने गोरोबाकाकांना नमस्कार केला.

शेजारी उभ्या असलेल्या संती आणि रामी पुढे झाल्या आणि त्यांनी सर्व संतमंडळींना नमस्कार केला.

पुन्हा एकदा विठ्ठलनामाचा जयजयकार करून मंडळी पांगली. मग संतमेळा एकत्र बसून काही काळ आनंदाने बोलत राहिला.

गोरोबांनी सर्व संतांना एकदा तेरढोकीला आपल्या घरी पायधूळ झाडण्याची विनंती केली. गोरोबांच्या विनंतीचा सर्वांनी आदर करायचे ठरविले. "आम्ही अवश्य आपल्या दर्शनाला येऊ!" अशा नम्र शब्दात सर्वांनी गोरोबांना आश्वासन दिले.


बराच काळ चाललेला हा सोहळा संपला.

गोरोबा, संती आणि रामी तेरढोकीला परत निघाले.

आता संत गोरोबाकाकांच्या वास्तव्याने तेरढोकीचे नाव

उजळले. गावकऱ्यांना गोरोबा कुंभाराची महती पटली. गावात आता गोरोबांच्या नेतृत्वाने भजनाची बैठक जमू लागली. अशा बैठकीची व्यवस्था संती आणि रामी उत्साहाने करू लागल्या.

"पुंडलीक वरदा हरि-विठ्ठल!" या नामघोषाचे सूर पंढरपुरापर्यंत पोहोचू लागले.



# 'हा कच्चा घट'

आज तेरढोकीच्या आसमंतात सर्वत्र उल्हासाचे नी उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. तेरढोकीच्या आसपासच्या गावांकडून एकसारखी माणसांची रीघ तेरढोकीकडे जाताना दिसत होती. आपापल्या गावी लोकांनी उत्स्फूर्तपणे केळीच्या, आंब्याच्या डहाळ्यांच्या, तोरण-पताकांनी गावे सजवली होती. सडे टाकून आणि रांगोळ्या काढून रस्ते निर्मळ केले होते. गावाच्या वेशीपाशी प्रमुख गावकरी पंढरीहून येणाऱ्या संत-मेळ्याचे स्वागत करायला उभे राहिले होते—

आज पंढरपुराहून ज्ञानेश्वर-नामदेवादी संतांचा मेळा तेरढोकीला गोरोबाकाकांच्या घरी पाहुणचार घेण्यासाठी येणार होता. ही पर्वणी साधण्यासाठी वाटेवरच्या गावांनी स्वागताची ही अशी तयारी केली होती. प्रत्यक्ष तेरढोकीत तर केवढी गडबड चालली होती.

संतांच्या स्वागताला आपलाही हातभार लागावा म्हणून प्रत्येकाची धडपड चालली होती. कोणी धान्य, कोणी दूध, कोणी फळे तर काहीजणांनी मांडवाचे सामान अशी आपापल्या परीने मदत देऊ केली होती. ज्यांना प्रत्यक्ष साहित्य आणता आले नाही ते श्रमाची कामे करण्यासाठी धडपडत होते. कोणी मांड-

वाचे, कोणी पाण्याचे, कोणी रांधण्याचे, कोणी वाढण्याचे अशी कामे आपणहून करीत होती.

स्नान करून शुद्ध झालेले, तुळशीमाळा घातलेले, बुक्का आणि गोपीचंद लावलेले असंख्य स्त्रीपुरुष आणि मुलेबाळे यांची जणू यात्राच भरली होती. तेरढोकी आज मुला-माणसांनी फुलून गेली होती. आरडा-ओरडा नाही, कावणे-कदारणे नाही, लहान-थोरपणाची जाणीव नाही, सारीजणं समभावाने आपापल्यापरीने आजचा सोहळा आनंदात पार पाडण्यासाठी धडपडत होती.

संती आणि रामी यांची तारांबळ तर विचारूच नका! त्यांच्या घरी आज जणू सणच होता. आणि ते खरेही होते! कारण 'संत येती घरा-तोचि दिवाळी दसरा!' त्यामुळे त्या दोघी तर भल्या पहाटे पासूनच कामाला लागल्या होत्या. पाण्याची, बैठकीची, भजनाची, नैवेद्याची कितीतरी तयारी त्यांना करायची होती. होता होता वेळ झाली आणि दुरून जवळ जवळ येणारा दिंडीतील भजनाचा आणि 'पुंडलीक वरदा-हरिविठ्ठल' या जयघोषाचा आवाज ऐकू येऊ लागला. साऱ्यांची उत्कंठा शिगेला पोचली.

संत–मेळा भजन करीत तेरढोकीत आला. सर्वांनी गोरोबा-काकांना नम्रपणे नमस्कार केला. विशेष म्हणजे या संत-मेळ्यात ज्ञानदेवांची छोटी बहीण मुक्ताई सुद्धा होती. गोरोबांनी मोठ्या कौतुकाने मुक्ताईला जवळ घेतले. स्वागताचे चार शब्द बोलून, एकमेकांचे कुशल विचारून संतमंडळी गोरोबाकाकांच्या घरी जायला निघाली. गोरोबांचा हात धरून छोटी मुक्ताई सर्वांपुढे चालत होती.

वाटेतले लोक कौतुकाने आणि आदराने संतमंडळींचे दर्शन

होताच भक्तिभावाने हात जोडत होते. संतमंडळीही हात जोडून नम्रपणे प्रति नमस्कार करीत चालली होती. अखेर सारी मंडळी गोरोबांच्या घरी आली.

संती आणि रामी यांनी चटचट सर्वांना गरम पाणी पाय धुवायला दिले. नंतर थंडगार पाणी आणि गूळ देऊन सर्वांचा श्रमपरिहार झाला. यानंतर संतांचे बोलणे सुरू झाले.

विठ्ठल आणि विठ्ठलभक्ती याखेरीज त्यांच्या बोलण्यात त्यांच्या बोलण्यात दुसरा विषय तरी कोणता असणार? आणि हा विषय निघाल्यावर या संतात माघार कोण घेणार! सारेच भगवंताचे महान् भक्त!

बोलता बोलता प्रामाणिक मतांची देवाणघेवाण चालू झाली. प्रत्येकजण अहमहमिकेने आपापले अनुभव आणि विचार सांगू लागला विशेषतः यात पुढाकार होता संत नामदेवांचा. त्यांची विठ्ठलभक्ती, त्यांचा विठ्ठलाचा सहवास यामुळे ते बरेच बोलत होते. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल किंवा भक्तीबद्दल कोणालाच संशय नव्हता. पण त्यांचा आवेश आणि आग्रह पाहून मुक्ताईला गंमत करावीशी वाटली.

सहज विषयाला कलाटणी दिल्यासारखे करून तिने एक नवीनच कल्पना काढली. गोरोबाकाकांचे मोठेपण सर्वांना मान्यच होते. त्यांचा भक्तिमार्गातला तसा वयाचाही अधिकार मोठाच होता. तेव्हा मुक्ताईने सर्वांना म्हटले,,

"आपल्या सगळ्यात गोरोबाकाका ज्येष्ठ आहेत. ते आपल्यापैकी प्रत्येकाची थापटण्याने परीक्षा करतील. बघू या. या परीक्षेत काय काय नि कसं ठरतंय ते! गोरोबाकाका आपण थापटणं घ्या

नि करा सर्वांची परीक्षा. आमच्या दादापासूनच करा सुरवात."

मग गोरोबांनी थापटणे हाती घेऊन प्रत्येक संताच्या डोकी-वर त्याचा आघात करायला आरंभ केला. संत म्हटला की निग्रह त्याला जमला पाहिजे. निवृत्ति, ज्ञानदेवांच्या नंतर आली नाम-देवांची पाळी! गोरोबा थापाटणं उगारून उभे राहिलेले पाहताच नामदेव एकदम प्रतिकारासाठी उठले.

"हा चांगला पाहुणचार आहे काका! डोक्यात थापटणं मारून बरी आमची गंमत पाहणार तुम्ही!" नामदेव म्हणाले.

सर्वांना हसू आले. मुक्ताई तर खळखळून हसली नी म्हणाली,

"अखंड जयाला देवाचा शेजार ।
त्याचा अहंकार कारे नाही गेला ॥

गोरोबाही हसतच म्हणाले, "हा घट अगदीच कच्चा आहे!"


नामदेव यावर रागावून तिथून धूम पळत निघाले ते सरळ पंढरपूरला देवासमोर जाऊन उभे राहिले.

* * *

या प्रसंगानंतर गोरोबाकाका हे साऱ्या संतमेळ्यात मान्यता पावले. पंढरीला नित्य सर्व संत त्यांना भेटत. त्यांच्याशी चर्चा करीत. भक्तिमार्गातला गोरोबांना अधिकार सर्वांना मान्य होता.

पुढे संतमंडळींबरोबर गोरोबा तीर्थयात्रेलाही गेले होते. नामदेवाच्या जीवनात गुरूपदेशाची अपूर्व पर्वणी निर्माण करणारे गोरोबा आपल्या भगवद्भक्तीच्या व्यवसायात अधिकाधिक मग्न राहून अखेर विठ्ठलरूप झाले.

# संत विसोबा खेचर



## विसोबा चाटी

"सावकाऽरऽ! अवं सावकाऽर!" लक्षा कुंभाराने हळी दिली; आणि तो दाराबाहेरच थांबला.

"कोन रं त्यो? का वरडतंय?" देवडीच्या ओटयावर पसरलेल्या कांबळयावर उठून बसत जोत्याजीने विचारले.

"मी लक्षा हाये जी!" लक्षाने उत्तर दिले.

"हं आलास!" जोत्याजी एव्हाना ओटयावरून उतरून दारात आला होता. "काय म्हनतोस?" जोत्याजीने प्रश्न केला.

"सावकारांनी बोलावलं हुतं!" लक्षाने सांगितले.

"होय की! मीच आलो होतो बोलाबायला. पण दुरपदीला मी सावकारांनी बोलावल्याचं सांगितलं होतं. तू कसा आलास?" जोत्याजीने तिरस्काराने प्रश्न केला. त्याचा आवाज चढला होता.

"अरं पन तू का खेकसतोस! सावकारांना सांग जा मुकाट" लक्षानेही आपला आवाज चढवला होता.

ओसरीवरच्या झोपाळ्यावर पानाचा डबा पुढे घेऊन बसलेल्या विसोबांना दारापाशी चाललेले भाषण ऐकू गेलें. तसे तें हातातल्या पानाला चुना लावीत झोपाळ्यावरून उतरले आणि थोडे पुढे येऊन दाराकडे पाहात म्हणाले,

"जोत्याजी, कोण आहे रे?"

"हा लक्षा कुंभार आलाय." जोत्याजीने उत्तर दिले.

"पाठव त्याला आत." असे म्हणत विसोबा पुन्हा झोपाळ्या-वर जाऊन बसले.

"धनी!" नम्रतापूर्वक हात जोडून लक्षा अंगणात उभा राहिला.

"हं काय लक्षा? काय म्हणतंय धंदापाणी? द्रौपदीला कुठं बाजाराबिजाराला पाठवलीस की काय?" विसोबांनी संथपणे बोलायला आरंभ केला.

"न्हाई!" लक्षा ठामपणे म्हणाला.

"मग तिच्या ऐवजी तू सा आलास?" विसोबांनी प्रश्न केला.

"धनी' आम्ही दरिद्री माणस. काम करून पोट भरणारी. गाव सांगेल ती कामं करायची नी पोट भरायचं हा आमचा सरळ एव्हार!" लक्षा.

"होय रे होय! पण पोटं भरायला काटे उपयोगी नाही पडत; अन्न लागतं! ते अन्न या गावात तुम्हाला मिळतंय–" विसोबांचा आवाज शब्दागणिक वर जात होता.

"होय धनी! या गावाचं लई उपकार हायेत आमच्यावर!" लक्षा अधिक नम्रतेने म्हणाला.

"अरे गावाचे उपकार म्हणून कंठरवानं म्हणतोयस पण

गात्रानं काय कधी चार कवड्या मोजल्यात तुम्हाला? द्रव्य हवं तेंव्हा सावकार आठवतो आणि मग उत्सव, नाच आले की गाव जवळचं वाटतं नाही?" विसोबा रागाने म्हणाले. त्यांच्या हातातल्या अडकित्यातली सुपारी आता वेगाने कापली जाऊ लागली होती.

"काही चुकलं असलं तर धा मारायचा नी एक म्हनायचा अधिकारच हाय तुमचा!" लक्षाने रागरंग ओळखून बोलायला आरंभ केला होता.

"लक्षा! लक्षात ठेव. त्या सन्याशाच्या पोरांचं तुम्ही मूर्खांनी अलीकडं फारच अवडंबर माजवलंय. द्रौपदी हल्ली वाड्यावरची कामं टाळून त्या पाखंड्यांच्या कौतुकात रमलीय. पण या विसोबाशी गाठ आहे म्हणावं." आता विसोबांचा पारा भलताच चढला होता.

"क्षिमा करा महाराज. पन देवाचं नाव कानावर पडतं म्हणून दुरपदी जाती तिकडं. वाड्यावर काय काम असलं तर पाठवतो तिला हिकडं." लक्षाला गरजेपोटी बोलावे लागले.

"वाड्यावरची कामं काही नडून रहात नाहीत. पण आमच्याशी वैर करून निभायचं नाही तुमचं एवढंच लक्षात ठेवा. कुंभारवाड्यातलं घर न् घर देणेकरी आहे आमचं. वसुलीचे तगादे सुरू करायला वेळ लागणार नाही. पण आमच्याशी वैर करणाऱ्या त्या संन्याशाच्या पोरांचा नाद वेळीच सोडा नी सरळ सुतानं वागा" विसोबा गरजून बोलले.

लक्षा हा भडिमार ऐकून थरथर कापू लागला. त्याबरोबर डोळ्यात एकप्रकारची खुनशी हास्याची लकेर खेळवत विसोबांनी चेहरा हसरा केला.

"लक्षा! अरे आम्ही सांगतो ते तरी धर्माचं म्हणूनच सांगतो ना. आज पिढ्या न् पिढ्या या गावात नांदलो आपण. कधी कुठं फट् झालं नाही. आता ही चार चटोर पोरं आमच्या पुढं शहाणपणा मिरवतात, जादूटोणे करतात नी तुम्ही खुळी माणसं त्यांच्या भजनी लागता हे खरं बरोबर आहे का? सांग बरं" विसोबांच्या स्वरात लाघव आणि आश्वासन यांची जाणीव होती.

लक्षाला हे लाघवी बोलणे ऐकून खूप धीर आला. तो हात जोडून म्हणाला, "आमचं चुकलं धनी! दुरपदीला लावून देतो वाड्यावर!"

"ते जाऊ दे रे! बायका माणसांची बुद्धीच तेवढी! पण कुंभारवाड्यात पुरुष माणसांनी आपल्या अकला काय गहाण टाकल्यात का?" विसोबा म्हणाले.

मग काही वेळ कोणीच बोलले नाही. विसोबांनी पान जमवून तोंडात कोंबले नि ते संथपणे झोका घेत काही काळ विडा तोंडात घोळवत राहिले. लक्षा अबोलपणे विसोबांच्या हालचाली पाहात उभा होता.

"काय रे लक्षुमण! काय असतं तरी काय त्या झोपडीत एवढं की गावकरी नित्य नेमानं तिथं जाऊन बसतात" विसोबांनी विचारलं.

"ज्ञानोबा पोथी सांगतो. अगदी सोपं, रसाळ बोलणं करतो. माणसं देहभान विसरून ऐकतात. भजनाला तर लई मजा येती. निवर्ती, ज्ञानोबा, सोपाना नि लहानगी मुक्ताई अशी गोड भजन करतात की समदी मानसं अक्षी रंगून जात्यात." हे बोलताना

लक्षा जणू ते क्षण अनुभवल्यासारखं सारं वर्णन करीत होता.

"थोतांड! एवढं काय ब्रह्मज्ञान सोपं आहे होय! देवाच्या नावानं कुणीही ओरडलं आणि देव भेटला त्याला, असं का आहे? अरे, आम्ही हयातभर प्रयत्न करतोय तरीं अजून आम्हाला नुसतं दोन पायऱ्या चढणं जमलेलं नाही! बरं ते असू दे–उद्यापासनं द्रौपदीला लावून दे वाड्यावर. जा तू!"

विसोबा एवढं बोलून झोपाळ्यावरून उठले, आणि आतल्या बाजूला निघून गेले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे काही वेळ पाहात राहिलेला लक्षा थोड्या वेळाने भानावर आला. काहीं तरी विचारात गढल्यासारखी त्याची मान नकारार्थी हालली आणि तो ताडकन् वळून वाड्याबाहेर पडला.

❊ ❊

विसोबा चाटी हे आळंदी क्षेत्रात राहणारे एक धनाढ्य व्यापारी होते. 'जिथे शिते तिथे भुते' या न्यायाने विसोबांना गावात चांगलीच मानमान्यता मिळाली होती. आपल्याजवळच्या पैशाने गावातल्या गरीबांना स्वतःच्या कह्यात ठेवण्याचे कसबही विसोबांना साधले होते. शिवाय गावात एखादे धर्मकृत्य निघाले की आपल्या जवळच्या थैलीचे तोंड रिकामे सोडायचे आणि गावकऱ्यात आपल्या धर्माभिमानाचा टेंभा मिरवायचा हे विसोबांचे खास तंत्र होते. या सर्वांमुळे विसोबा म्हणजे आळंदीतले एक बडे प्रस्थच झाले होते.

धर्मनिष्ठ, कर्मठ आणि प्रतिष्ठित अशा गावकऱ्यात विसोबांचा समावेश असल्याने ते गावात आढ्यतेने वागत. अहंकार

प्रत्येकाच्याच ठिकाणी असतो आणि अशी पार्श्वभूमी लाभली म्हणजे त्या अहंकाराच्या बीजाला चांगलेच खतपाणी मिळते. विसोबांचेही हेच झाले होते. 'राजा बोले, दळ हाले' अशा अधिकारानेच ते गावात वागत असत.

आळंदीच्या या कर्मठांना संन्यासोत्तर विठ्ठलपंतांना झालेली संतती हा असाच एक चेष्टेचा विषय झाला होता. गावातून या संततीची कशी उचलबांगडी करता येईल याची या मंडळींना सतत चिंता वाहण्याची सवयच जडली होती. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताई या भावंडांचा म्हणून तर परोपरीने छळ करावा; होईल तेवढा त्यांचा विरोध करावा; या भावंडांना कोणत्याही प्रकारे गावात थारा न मिळावा; यासाठी हे आळंदीकर कर्मठ सदैव प्रयत्न करीत असत.

अलीकडेच ज्ञानेश्वराने पैठणला जाऊन शुद्धीपत्र मिळविले, नेवासा येथे भगवद्गीतेवर प्रवचन केले, अनेकांना आपलेसे करून अनुयायी मिळविले आणि आता आळंदीकरांवरही त्याचा प्रभाव पडतो आहे याचा या कर्मठांना मनोमन संताप येई. त्यातूनच विसोबांसारखे लोक अगदी खालच्या पातळीवर जाऊन विरोध करू लागले होते.

लक्षा कुंभाराला विसोबांनी धमकावले हा त्याच प्रकारचा एक प्रसंग होता.

❋ ❋

"का वो बलीवलं होतं सावकारानं?" घराच्या उंबऱ्यावर बसलेल्या द्रौपदीने प्रश्न केला. लक्षा हा प्रश्न ऐकताच थांबला.

त्याने द्रौपदीकडे पाहिले आणि कपाळावर हात मारीत तो म्हणाला,

"आमचं कर्म! कामधंदा करून दिवसाकाठी जरा इरंगुळा म्हणून आपण त्या देवमाणसांकडं जातो. देवाचं नाव घेतो. चार चांगल्या गोष्टी कानावर पडत्यात म्हणून तिथं बसतो. तर हिकडं या द्रुष्टांच्या पोटात खुपतंय."

"अग बया! अन् ह्यो काय म्हणून जोरा?" द्रौपदी उद्गारली.

"अग ह्यो पैक्याचा जोरा हाये. आपन त्यांचं देनं लागतोय तवा दिसरात त्यांच्या सेवेत राह्यलं पाहिजे. त्यांना नको ते टाळलं पायजे. तुला वाड्यावर बोलावलंय त्ये काय कामं अडली म्हणून न्हाई, तर त्या लेकरांकडं तुमचा जीव वढतोय ते बघवत न्हाई म्हून!" लक्षा ताड्ताड् बोलत होता.

"बया ग! का ह्यो समंध त्या लेकरांवर कावलाय कुनाला ठावं! परत्येक्ष देवासारखा हाय माझा ग्यानबा! त्याच्याशी दावा मांडणाराचं कधी चांगलं व्हायचं नाही." द्रौपदीही तळतळून बोलत होती.

"अग ते झालं तुझं! पन गावात राहून या मानसांशी वैर कसं परवडायचं आपल्याला?" लक्षा समजावणीच्या सुरात बोलला.

"गाव म्हनं! साऱ्या गावात नव्हं पार पंढरीपावतर ग्यानोबाचं नाव गाजतंय. संत मंडळी त्याला मानताहेत, ग्यानी मानसं त्याच्या पायावर डोई ठेवायला येत्यात अन् या गावातल्या चार शान्यांनी त्याचा दुष्टावा धरलाय. कशापायी असं?" द्रौपदीचा सूर कायम होता.

"अग तसंच असतंय—पिकतं तिथं विकत नसतंय!" लक्षा म्हणाला.

यावर अधिक बोलणे न वाढवता तो आपल्या उद्योगाला लागला. त्यावर द्रौपदीही काही न बोलता आपल्या कामासाठी घरात गेली.

* *

आता ज्ञानेश्वरादी भावंडांनी गावातल्या भोळ्या-भाबड्यांचे, तसेच सज्जनांचे प्रेम जिंकले होते. आपल्या सालस, लाघवी आणि नम्र वागण्याने साऱ्यांना आपलेसे केले होते.

पैठण, पंढरपूर, नेवासा अशा ठिकठिकाणच्या भक्तांच्या मनात ज्ञानेश्वरादी भावंडांच्या अधिकाराविषयी अपार आदर निर्माण झाला होता. देव या मुलांचा पाठीराखा आहे; काही अलौकिक असे सामर्थ्य या पोरक्या मुलांच्या पाठीशी उभे आहे याची प्रचीतीही अनेकांना आली होती.

संतमंडळात या मुलांचा अधिकार मान्यता पावला होता. ज्ञान, भक्ती, योग याबाबतीत या मुलांनी असामान्य प्रगती केली आहे हे आता सर्वश्रुत आणि सर्वमान्य असे सत्य समजले जात होते. पण--


पण आळंदीतल्या काही कर्मठांनी मात्र या मुलांबाबत मनात निष्कारण आकस धरला होता. ही संन्याशाची मुले असल्याने ती धर्मबाह्य संतती असेच ते कर्मठ मानत. जादूटोणा करणारे किंवा जाणणारे ज्ञानेश्वर म्हणून त्यांची हेटाळणी करीत. होईल तेवढे त्यांचे जीवन असह्य करण्याची खटपट ते करीत. त्या मुलांच्या वैरासाठी कितीही हलक्या पातळीवर जात.

विसोबा हे आळंदीमधले असेच एक कर्मठ होते. स्वतःच्या

धर्माभिमानाचा टेंभा मिरविण्यात ते सतत मग्न असत. त्यात पुन्हा त्यांचा व्यापार चांगला चालत असल्याने, आणि गावात त्यांची सावकारी असल्याने त्यांना जो मान मिळे त्याने ते शेफारले होते. गावातल्या प्रतिष्ठितात त्यांची गणना असल्याने ते फार चढेल वृत्तीचे बनले होते. अहंकाराने माणूस आंधळा होतो म्हणतात तसेच त्यांचे झाले होते.

निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताई ही विठ्ठलपंतांची, म्हणजे संन्याशाची मुले, तेव्हा आळंदीसारख्या पवित्र आणि प्रसिद्ध क्षेत्रात त्यांना थारा नसावा म्हणून खटपट करणारात विसोबा होतेच. तसे पाहिले तर विसोबा चाटी हे स्वतः धर्मनिष्ठ होते. त्यामुळे या मुलांच्या मनात मात्र त्यांच्याविषयी कोणतीही कटु भावना नव्हती.

मधुकरी मागताना, सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी देवळात जाताना, गावसभेत अशा अनेक प्रसंगात विसोबांकडून अन्यायाचा पाठपुरावा केला गेला तरीही त्यांच्याविषयी वैयक्तिक रीत्या ज्ञानेश्वरादी भावंडांनी कधी आकस बाळगला नाही. उलट जिथे जिथे त्यांची गाठभेट झाली त्या त्या वेळी आणि स्थळी त्यांना आदरभाव दाखवूनच या मुलांनी त्यांची संभावना केली होती.



## 'मांडे करायला परळ तर हवा ।'

इंद्रायणीच्या पवित्र जलात स्नान करून, ओल्या वस्त्रांचे पिळे खांद्यावर टाकून, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई अशी चौघे भावंडे आपल्या पर्णकुटीकडे परतत होती. अजून पहाटही फुटली नव्हती.

आळंदी हे पवित्र आणि प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असल्याने तिथें प्रातःस्नानाची प्रथा होती. पहाटेच इंद्रायणीचा घाट गजबजू लागे. परगावचे यात्रिक आणि गावकरी यांची प्रातःस्नानासाठी घाई होई. त्यामुळे या चार भावंडांनी पहाटेपूर्वीच स्नाने उरकण्याचा क्रम ठेवला होता. आजही नित्याप्रमाणे पहाटेपूर्वीच आपली स्नाने उरकून ती भावंडे पर्णकुटीकडे परतत होती.

पर्णकुटीच्या आसमंतात ती सर्व पोचली असतानाच पहाट झाल्याची चिन्हे स्पष्ट होऊ लागली. पक्षी चिवचिवाट करू लागले, वृक्षांची पाने मंद वाऱ्यांच्या लहरींशी टकरून सळसळू लागली, प्रकाशकिरण पृथ्वीला स्पर्श करण्यासाठी झेपावत येऊ लागले.

"अहाहा!" सोपान जागच्या जागी थबकून म्हणाला, "क्षणापूर्वी अंधारात बुडालेली ही पर्णकुटी या कोवळ्या प्रकाशकिरणांनी कशी उजळून निघते आहे!"

त्या चौघाही भावंडांनी मागे पूर्वेकडे तोंड वळवून मोठ्या भक्तिभावाने सूर्यनारायणाला नमस्कार केला.

"देवा नारायणा! आपल्या तेजानं प्राणिमात्रांच्या अंतरात साचलेला अज्ञानाचा अंधारही दूर कर!" मुक्ताई हात जोडून, डोळे मिटून म्हणाली. त्याबरोबर ज्ञानेश्वर हसला.

"का रे हसलास?" मुक्ताईने आश्चर्याने विचारले.

"मुक्ताई! मी तुझ्या प्रार्थनेला हसलो नाही किंवा तुझ्या सद्भावनेलाही हसलो नाही. मी हसलो निराळ्याच कल्पनेनं." ज्ञानेश्वर म्हणाला.

"कोणती कल्पना?" सोपानाने प्रश्न केला.

"प्राणिमात्रांनी आपल्या अंतराची कवाडं प्रकाशाला खुली केली तरच ना प्रकाश तिथवर पोचणार! रूढी, अहंकार, ढोंग, अभिमान, हट्ट यांच्या भरभक्कम भितींनी जोवर या प्राण्यांच्या अंतःकरणाभोवती कडेकोट बंदिस्ती उभी केली असेल; तोंवर या सदिच्छा, सद्भावना किंवा प्रार्थना म्हणजे मनातल्या मनात मांडे खाण्याचाच प्रकार–" ज्ञानेश्वर गंभीरपणे म्हणाला.

"खरंच! मुक्ताई, आपण खरोखरीचे मांडे किती दिवसात खाल्लेच नाहीत. करशील का तू?' निवृत्तीनाथ मधेच म्हणाले.

"म्हटलं मांडे करणं सोपं नाही. मनातल्या मांड्यांचं ठीक आहे." सोपान मुक्ताईकडं पाहात म्हणाला.

"तसं नको समजू! मनात खायला मांडे आठवले ते मांडे करायचे ठाऊक आहेत म्हणूनच." मुक्ताईने उत्तर दिले.

"मग सांग पाहू कसे करायचे मांडे ते?" सोपानाने मुक्ताईला प्रश्न केला.

निवृत्तीनाथ आणि ज्ञानेश्वर यांची यावेळी नेत्रपल्लवी चालली होती. ते दोघेही एकमेकांकडे पाहात होते. डोळ्यांच्या भाषेत बोलत होते. मधूनच त्यांच्या तोंडावर स्मितरेषा पसरत होत्या. पुन्हा ते गंभीर होत होते. त्यातच सोपान—मुक्ताई यांचा संवाद ऐकत होते.

"हे बघ सोपाना, सांगण्यापेक्षा करणं महत्त्वाचं. मी खरंच मांडे करून दाखवते की नाही बघ. अरे, तुला आठवत कसं नाही. आपण पैठणला गेलो तेव्हा नाही का कृष्णाजीपंतांच्या काकूंबरोबर मी मांडे केले." मुक्ताई गंभीरपणे सोपानाला समजावीत होती.

"ए आजीबाई, उगीच बोलण्यात फसवू नकोस मला. आपल्या ज्ञानेश्वरदादांबरोबर मीही होतो म्हणून काय त्यांचं कर्तृत्व मी माझ्याकडे घ्यावं होय!" एवढे बोलून सोपान खद-खदून हसला.

आता ती भावंडे पर्णकुटीत पोचली होती. मुक्ताईने खांद्या-वरचे पिळे खाली टाकले नी, तरातरा दाराशी येऊन,

"दाखवतेच आता!" असे म्हणत ती बाहेर पडू लागली.

"अग अग मुक्ताई! कुठं निघालीस एवढ्या घाईनं?" तिला मध्येच थांबवत निवृत्तिनाथ म्हणाले.

"दादा! मांडे करायला परळ लागतो. तो आणायला निघाले आहे." मुक्ताईने सांगितले.

"परळ लागतो आणायला हवा, एवढं बरोबर! अग पण अजून कुंभारवाड्यात जागही आली नसेल. थोडं उजाडू दे. मग

जा." ज्ञानेश्वराने तिची समजूत घातली.

मग मात्र मुक्ताई थंड झाली. आपल्याशीच हसली. नित्याचे उद्योग तिने सुरू केले. इतर भावंडेही आपापली नित्यकर्मे उरकण्याच्या तयारीला लागली.

ध्यान, जप, पूजाअर्चा, वाचन, पठण या आपापल्या आवडीच्या विषयात प्रत्येकजण मग्न झाला.

काही वेळाने चांगले फटफटीत उजाडले.

घरातली काही कामे उरकून मुक्ताई बाहेर पडण्यासाठी तयार झाली. ज्ञानेश्वर तुळशीजवळच्या कट्ट्यापाशी बसून पठण करीत होता. मुक्ताई त्याच्याजवळ जाऊन म्हणाली,

"दादा, मी कुंभारवाड्यात परळ आणायला जातेय रे."

"ठीक आहे. लवकर ये." ज्ञानेश्वर म्हणाला.

मुक्ताई निघाली. आज आपण काही तरी अपूर्व करणार आहोत या कल्पनेने ती सुखावली होती. तिच्या चालीतही एकप्रकारे उल्हास जाणवत होता. चालण्याच्या ठेक्यावर ती तोंडाने 'राम कृष्ण हरि जयजय' हा नाममंत्र जपत होती.

पर्णकुटी मागे टाकून ती गावाच्या शिवेवर असलेल्या कुंभारवाड्यापाशी पोचली. त्याचवेळी तिच्या उलट दिशेने विसोबा चाटी आपल्या शागीर्दासह येताना तिने पाहिले. ती थोडीशी आड उभी राहिली. पण तेवढ्यात विसोबांचेही लक्ष तिच्याकडे गेले.

"राम, राम, राम! सकाळी उठल्यावर हे अभद्र दर्शन का प्रथम! काय उच्छाद मांडलाय या कारट्यांनी!" अशी तोंडाने बडबड करीतच विसोबा मुक्ताईच्या दिशेने पुढे झाले.

विसोबा मुक्ताईच्या समोर येताच मुक्ताईने दोन्ही हात जोडून आणि मस्तक लववून नमस्कार करीत म्हटलं,

"प्रणाम भूदेव!"



"अॅ हॅ हॅ! काय पण नाटकीपणा! म्हणे प्रणाम! काय ग भवाने सकाळच्या वेळी आपलं हे अभद्र तोंड कशाला दाखवलंस?" विसोबांचा स्वर चढलेलाच होता.

"आपणच आज थोडं उशीरा गंगास्नानाला निघालात. सकाळ झाल्यावरच मी गावात आले." मुक्ताई नम्रपणे बोलली.

"म्हणजे आता तुम्हा संन्याशाच्या कारटयांच्या मर्जीवर का गावातल्या गृहस्थांनी आपला दिनक्रम आखायचा!" विसोबा.

"छेः छे:! आपणच घालून दिलेल्या नियमाप्रमाणं आम्ही पामरांनी वागायचं. म्हणून तर पहाटेपूर्वी स्नानं उरकून आम्ही कुटीत परततो नी चांगलं उजाडल्याशिवाय गावाकडं येत नाही." मुक्ताई.

"मग आज कुठं निघालीय धिंडका?" विसोबा मुक्ताईच्या नम्रपणामुळे खवळून बोलत होते.

"कुंभारवाड्यात जाणार होते मी." मुक्ताई उद्गारली.

'कशाला? संध्याकाळी तिकडे या म्हणून बोलवायला? का गावाविरुद्ध कुंभारांना फितवायला?" विसोबांनी विचारले.

"नाही हो! मी द्रुपदाकडून परळ आणायला निघालेय." अजून मुक्ताईने नम्रता सोडली नव्हती.

"परळ? मांड्यांचा बेत करायचाय की काय?" विसोबांच्या प्रश्नात उपहास होता. "ऐकलंस का जोत्याजी! ही भिकारडी मांडे खाताहेत मांडे! भीक मागण्याचं ढोंगच म्हणायचं तर तुमचं!"

"आम्ही धर्माची भीक मागतो, पण तीही कोरान्न भिक्षा! आज दादांना मांडे खायची इच्छा झाली." मुक्ताईने ठामपणे सांगितले.

"अरे वा! बरेच आहेत की तुझे दादा—बोके संन्यासी." विसोबांनी कुत्सितपणे हसत हसत म्हटले.

"भूदेव! आपण निष्कारण अपशब्द उच्चारून आपली वाणी का विटाळता आहात. आम्ही आपला कधी अधिक्षेप केला नाही, आपण सांगितल्या चाकोरीबाहेर कधी वागलो नाही. असं असूनही आपण आमच्याशी असं का बरं वागता?" मुक्ताई म्हणाली.

"अरे वा:! बरीच चुरुचुरु बोलते की चिमुरडी पोर. चल

जोत्याजी, हिला परळ देऊ या." विसोबा मुक्ताईसह कुंभारवाड्यात गेले.

मुक्ताई निमूटपणे लक्षा कुंभाराच्या द्रौपदीकडे गेली. बरोबर विसोबाही होतेच. द्रौपदी उंबऱ्यातच बसली होती.

"मला एक परळ हवा होता द्रुपदाआत्या!" मुक्ताईने सांगितले.

"अग, द्रौपदी! ही तुझी भाची आलीय परळ मागायला." विसोबा द्रौपदीकडे एकटक पाहात म्हणाले.

"देत्ये हं!" असे म्हणत द्रौपदी उठली नी चार परळ घेऊन आली. तिने ते परळ मुक्ताई समोर ठेवले.

"यातला चांगला निवडून घ्या बरं बाई. एवढेच शिल्लक आहेत." द्रौपदी म्हणाली. मुक्ताई परळ बघून घ्यायला लागली.

तेवढ्यात विसोबांनी त्या परळांवर हातातली काठी मारली. सगळ्या परळांचा चुरा झाला. विसोबा खदाखदा हसू लागले.

"अवं, अवं! सावकार! काय केलंसा हे! आता माझ्याकडं दुसरा परळ बी नाय द्यायला." द्रौपदी किंचाळली.

"झालं समाधान. एवढे धर्मनिष्ठ आपण, पण पोरकटपणा काही गेला नाही तुमचा." मुक्ताई शांतपणे म्हणाली आणि दुसऱ्या कुंभाराकडे निघाली.

"जोत्याजी, सगळ्या कुंभारांना ताकीद दे. म्हणावं खबरदार या कारटीला परळ द्याल तर!" विसोबांनी आपल्या शागीर्दाला आज्ञा केली.

मुक्ताईने एखाद्या ठिकाणी परळ घेतला तर तो फोडून टाकण्याच्या ईर्षेने विसोबा तिच्याबरोबर निघाले.

आता, आपल्याला परळ मिळणे शक्य नाही हे ओळखून हिरमुसले तोंड करून मुक्ताई परत फिरली. विसोबांनी तरीही तिची पाठ सोडली नाही. अंगात संचार झाल्याप्रमाणे, तोंडाने बडबड करीत ते मुक्ताई मागोमाग तरातरा चालत होते.

मुक्ताई आपल्याच विचारात, शक्यतो लवकर पर्णकुटी गाठण्यासाठी झपाट्याने चालत होती. मागून येणाऱ्या विसोबांचा विचारही तिच्या मनाला शिवत नव्हता. तिच्या मनात विसोबांच्या दुष्टपणाचा विचार नव्हता तर–

"निवृत्तीदादांनी मांडे खाण्याची इच्छा प्रकट केली, पण त्यांची ती इच्छा आपण पूर्ण करू शकत नाही, याचेच वाईट वाटते! आता ज्ञानेश्वरदादालाच सांगितले पाहिजे! मांडे करायला परळ तर हवा!"

हाच विचार ती सतत करीत होती.



## ' परळ नसला तरी मांडे होतीलच।'

पर्णकुटीजवळ येईपर्यंत टिकवलेले अवसान कायम ठेवणे आता मुक्ताईला कठीण झाले होते. पर्णकुटी दिसू लागताच ती धावत निघाली. अंगणात तिने एकदा भरल्या डोळ्यांनी भरभर पाहिले. निवृत्तिनाथ अजूनही चाफ्याच्या झाडाखाली ध्यानस्थ बसले होते. पण ज्ञानेश्वर अंगणात कुठेच दिसला नाही. मुक्ताई तशीच पर्णकुटीत शिरली. तिथे ज्ञानेश्वर पोथी बासनात गुंडाळून ठेवताना तिला दिसला.

"ज्ञानेश्वरदादा!" एवढेच शब्द उच्चारून मुक्ताई घळाघळा आसवे ढाळू लागली. तिची ती केविलवाणी अवस्था पाहून ज्ञानेश्वर लगेच हातातले काम ठेवून तिच्याजवळ गेला. त्याने तिला विचारले,

"काय झालं मुक्ताई? कोणी बोललं का तुला?"

मुक्ताईने नुसती नकारार्थी मान हलवली. आणि पुन्हा लगेच होकारार्थी मान हलवली.

"अग, मग बोलणाराचे शब्द वाया गेले. तू का वाईट वाटून घेतेस?" ज्ञानेश्वराने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत म्हटले.

"बोलल्याचं नाही रे एवढं मला वाईट वाटत. पण परळ मिळाला नाही याचं वाईट वाटतंय. आता दादांना आपण मांडे कसे तयार करून देणार?" मुक्ताई म्हणाली.

मध्यंतरी काही वेळ जाऊ देणेच इष्ट आहे असे समजून ज्ञानेश्वर म्हणाला, "हे बघ मुक्ता! तू आधी तोंड स्वच्छ कर. जरा शांत हो आणि मग मला सारं सांग." एवढं बोलून ज्ञानेश्वर पोथी बांधण्याच्या उद्योगाला लागला. मुक्ताई अंगणातल्या दगडाशी जाऊन तोंडावर पाण्याचे हबके मारू लागली–

याचवेळी मुक्ताईच्या पाठोपाठ आलेले विसोबा पर्णकुटीच्या मागच्या बाजूला येऊन पोचले होते. मध्येच मुक्ताई पळत पुढे आल्यामुळे त्यांना यायला एवढा वेळ लागला होता. आपण परळ फोडून या पोरांची चांगलीच अडचण केली. आता आपल्याविषयी ही पोरे काय काय बोलतात हे ऐकावे असे विसोबांना वाटत होते. म्हणूनच ते पर्णकुटीच्या मागच्या बाजूला यऊन लपले होते. एखाद्या चोरट्यासारखे त्यांचे मन बनले होते. अशा माणसांनाच आपल्या कृतीचा परिणाम जाणून घेण्याची उत्सुकता असते–

काही वेळाने ज्ञानेश्वर आणि मुक्ताई यांचे बोलणे सुरू झाले. विसोबा कुडाच्या भिंतीला कान लावून ऐकू लागले.

मुक्ताईने विसोबांची भेट, त्यांचे बोलणे, आपले बोलणे, कुंभारवाड्यातली हकीगत हे जसे घडले तसे ज्ञानेश्वराला सांगितले.

"ठीक आहे. ईश्वराची इच्छा!" ज्ञानेश्वर शेवटी म्हणाला.

"ते सगळं झालं खरं! पण ज्ञानेश्वरदादा मला वाईट याचं वाटतंय की निवृत्तीदादांनी म्हटलेलं एवढंही आपण पूर्ण करू शकत नाही." मुक्ताई गंभीरपणाने म्हणाली.

"का?" एकदम ज्ञानेश्वराने प्रश्न केला. "दादांना मांडे खावे अशी इच्छा झाली; ती सुद्धा एक ईश्वरी प्रेरणाच आहे! ईश्वरानंच ती इच्छा पूर्ण करायची. आपण केवळ निमित्तमात्र असायचं. मुक्ताई..." ज्ञानेश्वराच्या मुद्रेवर एक प्रखर तेज प्रकट होत असल्याचे मुक्ताईला जाणवले. ती मूकपणाने नुसती ज्ञानेश्वराकडे पाहात राहिली.

बराच वेळ झाला तेव्हा मुक्ताईने डोळे मिटून बसलेल्या ज्ञानेश्वराला हाक मारली, "ज्ञानेश्वरदादा!"

ज्ञानेश्वराने डोळे उघडून मुक्ताईकडे पाहिले. एकाएकी त्याच्या गंभीर चेहऱ्यात बदल झाला. त्याचा चेहरा हसरा दिसू लागला.

"मुक्ताई, तू तयारीला लाग. मांडे होतील!" ज्ञानेश्वर हास्य कायम ठेवून म्हणाला.

"अरे पण दादा, परळ नको का?" मुक्ताईने विचारले.

"परळ कशाला, माझी पाठ आहे ना!" ज्ञानेश्वर पुन्हा गंभीर झाला होता. त्याची मुद्रा प्रखर निश्चयी बनली होती.

"बाई गऽ! पाठीवर परळासारखे मांडे कसे होतील?" मुक्ताईने गोंधळल्यासारखी मुद्रा करीत प्रश्न केला.

"मुक्ताई, इकडे ये!" ज्ञानेश्वराने मुक्ताईला जवळ घेऊन हळू आवाजात काही तरी सांगायला आरंभ केला.

इतका वेळ या दोघा भावंडांचे संभाषण मोठ्या आवाजात चालू असल्याने विसोबांना ते बाहेरून स्वच्छ ऐकायला मिळत होते. पण मध्यंतरी गेलेला वेळ, ज्ञानेश्वराचा निश्चय, नंतर परळाऐवजी पाठीचा उपयोग करण्याचा उल्लेख, मग पुन्हा

निर्माण झालेली शांतता, यामुळे विसोबांची उत्सुकता वाढली होती. आता काही तरी गंमत पाहायला मिळणार या भावनेने विसोबांची उत्कंठा वाढली. त्यातच ज्ञानेश्वराचे "मुक्ताई, इकडे ये!" हे शब्द ऐकल्यावर तर त्यांना स्वस्थ बसवेचना. आत काय घडणार आहे ते पाहण्याविषयी ते अधीर झाले. मग हळूच बसल्या जागेवरून उठून, त्यांनी आत चाललेले दिसावे, अशा एका फटीचा शोध घेतला. ते त्या जागेवरून आत लक्षपूर्वक पाहू लागले.

ज्ञानेश्वराने अत्यंत हळू आवाजात मुक्ताईला काही सांगितले. ते ऐकत असताना मुक्ताईचा चेहरा प्रफुल्ल होत होता. ज्ञानेश्वराचे सांगून होताच ती झटपट मांड्यासाठी लागणारे इतर साहित्य एकत्र करू लागली. ज्ञानेश्वर मात्र असल्या जागीच डोळे मिटून ध्यानस्थ बसला--

विसोबा पाहात होते. मुक्ताईच्या हालचालीत त्यांना विश्वास जाणवत होता. ज्ञानेश्वराच्या ध्यानस्थ चेहऱ्यावर मात्र क्षणाक्षणाला अलौकिक तेज प्रकट होत होते. आता तर ज्ञानेश्वराचे सर्वांग लाल लाल होत होते. विसोबांना त्या तेजःपुंज, लाल, प्रखर ज्ञानेश्वर मूर्तीकडे एकटक पाहणेही कठीण होत होते. ते आळीपाळीने आपली दृष्टी मुक्ताई आणि ज्ञानेश्वर यांच्याकडे वळवत राहिले.

काही वेळाने ज्ञानेश्वरांच्या ध्यानस्थ अवस्थेत बदल झाला. ते आता ओणवे झाले. त्यांच्या मुखातून अग्नीच्या ज्वाळा बाहेर पडू लागल्या. पाठ लाल लाल तापलेल्या तव्यासारखी झाली. मुक्ताई मांडे करण्याचे साहित्य घेऊन सिद्धच होती. तिने चटचट

मांडे लाटून, ज्ञानेश्वरांच्या पाठीवर भाजण्यास आरंभ केला. निवृत्तीनाथ न बोलावता आत आले. मुक्ताईने तयार केलेले मांडे



पाहून त्यांनी सोपानदेवाला हाक मारली. तोही आला. ज्ञानेश्वरांच्या योगसामर्थ्याचे हे कौतुक त्या भावंडांनी तर पाहिलेच पण—

बाहेरून विसोबाही हे सर्व पाहातच होते. त्यांना आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला या बालयोग्यांची आपण इतके दिवस कुचेष्टा केली याबद्दल त्यांना वाईट वाटू लागले. विसोबा हे मूळचे धर्मनिष्ठच होते. परंतु रूढीच्या, अहंकाराच्या आणि प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांनी इतके मोठे अधिकारी पुरुष आपण अपमानीत केले याची त्यांना लाज वाटू लागली. त्या पश्चात्ताप-

दग्ध आणि दुःखमय मनाच्या तिरमिरीतच ते पर्णकुटीत शिरले. त्यांनी ज्ञानेश्वरांपुढे साष्टांग दंडवत घातले.

"तू दूर हो खेचरा!" ज्ञानेश्वर गरजले.

त्या ज्ञानेश्वरांच्या उद्‌गाराबरोबरच ह्यांची योगसमाधी संपली. ते पुन्हा नेहमीच्या अवस्थेत आले.

"मला क्षमा करा योगिराज! मी आपला अनंत अपराधी आहे." विसोबा विनवू लागले. विसोबांच्या शब्दाशब्दात जाणवणारी विसोबांच्या शुद्ध भावनेची साक्ष ज्ञानेश्वरांनी ओळखली. यावेळी विसोबांच्या डोळ्यातून घळघळ अश्रुधारा वाहात होत्या. ते अबोलपणे आसवे ढाळीत गुढघे टेकून बसले होते. मधून मधून डोके ज्ञानेश्वरांपुढे टेकवीत होते.

अशा स्थितीत काही काळ गेल्यावर निवृत्तीनाथांनी खूण केली आणि मग ज्ञानेश्वरांनी विसोबाच्या डोक्यावर हात ठेवला.

"उठा विसोबा खेचर!" ज्ञानेश्वरांनी म्हटले.

"अभय मिळाल्याशिवाय–" विसोबांनी बोलायला आरंभ केला पण त्यांचे बोलणे मध्येच तोडून ज्ञानेश्वर म्हणाले,

"सोपानदेवा, घे बाबा ताब्यात तुझं तू!"

यानंतर ज्ञानेश्वरांनी आणि सोपानदेवांनी विसोबांना योग्य तो उपदेश केला. 'सर्वभूती भगवद्‌भाव' ठेवण्याची किमया विसोबांना शिकवली.

❋ ❋

या प्रसंगानंतर विसोबा हे नित्य पर्णकुटीत येऊ लागले. गावातल्या इतर माणसांप्रमाणे ज्ञानदेवांच्या प्रवचनांना हजर राहू

लागले. विसोबांच्या वागण्या बोलण्यात आता पुष्कळच बदल झाला होता. सालस, प्रेमळ आणि नम्र अशी त्यांची वागणूक लोकांना आश्चर्यात पाडत होती. आळंदीतल्या ज्या प्रतिष्ठितांनी ज्ञानेश्वरादी भावंडांचा विरोध कायम ठेवला होता त्यांच्याशी विसोबा मिळून मिसळून वागेनासे झाले. सर्वच गावकऱ्यांना विसोबांच्या वृत्तीत पडलेला फरक जाणवत होता.

पूर्वीचे विसोबांच्या बैठकीतले प्रतिष्ठित गावकरी आता विसोबांची थट्टा करू लागले. 'या विसोबाला ज्ञानेश्वरानं चेटुक केलं!' असे म्हणून ते विसोबांची हेटाळणी करू लागले. अशावेळी

"**महाविष्णूचा अवतार । गुरू झाला ज्ञानेश्वर ।।**"

अशा शब्दात विसोबा आपली श्रद्धा प्रकट करीत. एखाद्यावेळी ते "**माझी मूळपीठिका सोपानसद्‌गुरू । तेणे माथा करु ठेवियला ।।**" अशा शब्दात आपलें मनोगत प्रकट करीत.


पण आळंदीतले ज्ञानेश्वरांचे विरोधक विसोबाला नित्य सतावू लागले तेव्हा विसोबांनी आळंदी गावच सोडायचे ठरविले. पण काही दिवस ज्ञानेश्वरादींच्या सहवासात घालवावे म्हणजे आपले ज्ञान पूर्ण होईल. असा विचार ते करू लागले. ही त्यांच्या अंत:करणाची उलघाल वारंवार होणाऱ्या भेटीत त्यांनी आपल्या गुरूजवळ व्यक्त केली तेव्हा त्यांना अशी आज्ञा झाली–

"विसोबा, आता आपल्याला आपला जीवनमार्ग दिसला आहे. ज्ञानाच्या प्रकाशात आपण तो मार्ग निर्वेधपणे आचरू शकाल. आळंदी काय नि इतर कुठलेही क्षेत्र काय आपल्याला सारखेच समाधान देईल. मग गुंता कशाला? आंवढ्याच्या नागनाथानं तुम्हाला बोलावलं आहे. निवांत जा!"

यावर आणखी काही प्रश्नोत्तरे झाली. विसोबा तप्त झाले. त्यांच्या तोंडून सहजपणे शब्द बाहेर पडले.

"सोपान बोळला मजवरी ।
जन्ममरणाचे भय नाही आता ।
खेचरी तत्त्वता मुद्रा दिली ।।"

एका अवघड प्रश्नाची सोडवणूक झाली नि विसोबा आळंदी सोडून आंवढ्यास नागनाथाच्या सेवेत रुजू झाले.



# गुरुदेव विसोबा खेचर

ज्ञानेश्वर आणि सोपानदेव यांच्याकडून विसोबांना जे ज्ञान प्राप्त झाले त्या ज्ञानाने विसोबांची वृत्ती आमूलाग्र बदलून गेली. ते आता तृप्त मनाने आपल्याच ठिकाणी ईश्वराचे रूप आठवीत आणि सर्वांच्या ठायी समभाव ठेवून वागू लागले. काही दिवस आळंदीतच आपल्या गुरूंच्या सहवासात घालविल्यानंतर गुरूंच्या आज्ञेनेच विसोबा नागनाथाच्या मंदिराकडे आले होते.

एव्हांना ज्ञानेश्वरादी भावंडांनी ठेवलेले 'खेचर' हे नाव रूढ होऊन, लोक 'विसोबा खेचर' याच नावाने विसोबांचा उल्लेख करू लागले होते. 'ख' म्हणजे आकाश आणि आपल्या योगबळाने आकाशात 'चर' म्हणजे विहार करू शकणारे असे 'खेचर' नाव विसोबांनी प्राप्त करून घेतले. आता त्यांचे आत्मज्ञान आणि पारमार्थिक क्षेत्रातला अधिकार मोठा होता. सद्गुरू ज्ञानेश्वरांच्या आज्ञेप्रमाणे विसोबा आळंदी सोडून आंवढ्याला आले होते.

विसोबा खेचरांनी औंढ्याला नागनाथाच्या देवालयात आपली पुढची साधना करीत कालक्रमणा सुरू केली.

एके दिवशीं प्रात:काळी विसोबा खडबडून जागे झाले. त्यांना एक स्वप्न पडले होते. या पहाटेच्या स्वप्नात त्यांना जे

दिसले ते सारेच आश्चर्यकारक होते-

संत गोरोबाकाकांच्या घरी एका समारंभाची तयारी सुरू झाली होती. दूरवरून सुरेल आवाजात म्हटल्या जाणाऱ्या आणि टाळ मृदंगाची साथ लाभलेल्या, अभंगाच्या ओळी तरंगत येत होत्या. त्या स्वरलहरींमधून येणाऱ्या आवाजातले कितीतरी आवाज विसोबांना परिचयाचे वाटत होते. थोडे लक्ष देऊन ऐकल्यावर त्यांच्या लक्षात आले की ज्ञानदेव, सोपानदेव, नामदेव यांनी म्हटलेले अभंगच आपल्या कानावर पडत आहेत. ज्ञानदेव आणि सोपानदेव यांचे स्मरण होताच आपोआप विसोबांचे हात जोडले गेले.

'अरे, पण हा मंजुळ स्वर कोणाचा?' कोणीतरी लहान मुलगी गात होती. 'कोण बरे?' 'हो, हो ! छोटी मुक्ताईच ही!' अशी विचारमालिका विसोबांच्या मनात निर्माण होऊन गेली. ते आतुरतेने पुढच्या दृश्याचा अंदाज घेऊ लागले. तेवढ्यात एक दिंडी जवळ आल्याचा भास त्यांना झाला.

सर्व संतांचा मेळाच गोरोबाकाकांच्या घरी आला होता. या संतांनी जी दिंडी पंढरपुरापासून तेरढोकीपर्यंत आणली होती त्यात सर्वच संतमंडळी होती. अग्रभागी नामदेव आणि छोटी मुक्ताई होती. मागे धीरगंभीर पाऊले टाकीत निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव चालत होते. आणखी शिवाय जनाबाई, सांवता, परसा असे कितीतरी-! गोरोबांनी सर्वांचे स्वागत केले. काकांच्या घरापुढच्या मांडवात सारेजण आले. श्रमपरिहारासाठी गूळ-पाणी देण्यात गोरोबाकाकांच्या दोन्ही बायका संती आणि रामी गढून गेल्या होत्या.

काही वेळ खुशालीच्या आणि समाचाराच्या बोलण्यात गेल्यावर संतमंडळीत आत्मज्ञान, देवाची भक्ती, गुरूपदेश, साक्षात्कार वगैरे विषयांवर बोलणे सुरू झाले. पंढरीनाथ पांडुरंगाच्या भक्तीमध्ये रमलेल्या त्या संतांनी विठ्ठलकृपेवरही बोलणे सुरू केले. साहजिक संत नामदेवांनी हिरीरीने बोलण्यात पुढाकार घेतला. इतरांना या विषयात आपल्या इतका अधिकार नाही अशा काहीशा अहंकारी भावनेने नामदेव बोलत होते.

नामदेवांच्या बोलण्यातला अहंकार मुक्ताईलाच नव्हे तर इतर कोणालाच फारसा आवडला नव्हता. काहींनी डोळ्याच्या भाषेत आपली नाराजी इतरांना समजेल अशा पद्धतीने व्यक्त केली पण धिटुकली मुक्ताई म्हणाली,

"नामदेवांना देव भेटला, त्यांच्याशी तो बोलला, कित्येकदा त्यांच्याबरोबर वावरला हे सर्व जरी खरे आहे; तरी नामदेवांना हे सारे प्राप्त झाले ते केवळ त्यांच्या निस्सीम भक्तीमुळेच. नामदेवांना अजून खरे ज्ञान मात्र प्राप्त झालेले नाही हेही तितकेच खरे!"

"कोण मुक्ताई का बोलली हे. मग ठीकच आहे. नित्य देवाचा सहवास लाभलेल्या मला ज्ञानाची महती सांगणं तिच्या बालबुद्धीलाच शोभतंय. मी सर्व काही समजून, पावून तृप्त आहे." नामदेवांनी पुन्हा अहंकार प्रकट केला.

"नामदेवा! आपण ज्या अहंकारी वृत्तीने बोलता आहात त्यावरून 'बालबुद्धीचं' प्रदर्शन कोण करतंय ते सर्वजण पाहातच आहेत. अहो– **अखंड जयाला देवाचा शेजार । त्याचा अहंकार का नाही गेला ।।** " मुक्ताईने अशा ठसक्यात हे बोलून दाखविले

की सर्वजण चकित झाले. पण नामदेवांना या बोलण्याचा राग आला.

नामदेव आणि मुक्ताई यांचा वाद काही काळ रंगला मग ज्ञानदेवांनी मुक्ताईला म्हटलं,

"मुक्ताई! अग नामदेव हे विठ्ठलाचे लाडके भक्त आहेत. त्यांच्याशी असं बोलू नये."

"विठ्ठलाचे लाडके भक्त असले म्हणजे काय ज्ञानवंत झाले का ते? भक्ती वेगळी, ज्ञान वेगळं! ज्ञानाच्या बाबतीत ते कच्चेच आहेत." मुक्ताईने आपली बाजू पुन्हा मांडली.

"परीक्षा केल्याखेरीज दुसऱ्याला नावं ठेवणं याचं नाव ज्ञान असेल तर गोष्ट वेगळी. माझी माघार आहे बुवा." नामदेवांनी मुक्ताईला टोमणा मारला.

"परीक्षाच हवी असेल तर तीही होऊ दे. आपल्यात गोरोबाकाका सर्वात वडील आहेत. त्यांनीच इथे जमलेल्या सगळ्या मडक्यांची परीक्षा करावी." मुक्ताईने म्हटले.

ही सूचना सर्वांनाच पटली. गोरोबांनी "ठीक आहे" असे म्हणून थापटणे हाती घेतले आणि हसत हसत म्हटले,

"हा तर आमचा नित्याचाच व्यवसाय आहे. आता एक एक मडकं तपासतो. नुसत्या आवाजावरून कच्चे की पक्के सांगू आम्ही."

संतमंडळीत एकच हशा पिकला मुक्ताई पुन्हा म्हणाली,

"अगदी खरं! आमच्या निवृत्तिदादांपासून करा आरंभ."

गोरोबांनी निवृत्तिनाथांच्या डोक्यावर थापटणे मारले. नाथांनी हूं की चूं केले नाही. यानंतर ज्ञानदेवांची तशीच परीक्षा झाली.

"ही दोन्ही तर पक्की मडकी दिसतात. आता नामदेव!" गोरोबा म्हणाले.

गोरोबांनी नामदेवांजवळ जाऊन थापटणे उगारले. तेवढ्यात,

"वा काका! हा चांगला पाहुणचार आहे." असे म्हणत नामदेव ताडकन् उठून उभे राहिले.

"हे मात्र कच्चं मडकं निघालं." गोरोबा हसत म्हणाले.

"मग तेच तर मी म्हणत होते. मडक्यांना भाजतात तसा गुरूपदेशानं हा मनोघट भाजून काढावा लागतो; तरच खरं ज्ञान प्राप्त होतं. नामदेवांनी कुठं अजून गुरू केलाय?" मुक्ताई म्हणाली.

"माझा विठ्ठलच माझा सर्व काही आहे. तुम्हा संतांना जर माझ्यामध्ये काही कमीपणा वाटत असला तर मी विठ्ठलालाच विचारतो. त्यानं सांगितलं तरच मी गुरू करीन." नामदेव एवढे बोलून सरळ सभेतून निघाले. आता त्यांनी पंढरीचा रस्ता धरला. विठ्ठलाला ते आपला अपमान सांगण्यासाठी उतावीळ झाले होते.

यानंतर कुठेही न थांबता नामदेव सरळ पंढरपुराला आले. तडक ते विठ्ठलासमोर जाऊन उभे राहिले नि म्हणाले,

"देवा! काय ही तुझ्या भक्ताची थट्टा! एवढं करूनही सारं फुकटच का गेलं. अजून मला गुरूपदेशाची आवश्यकता आहे?" नामदेवांनी ध्यानस्थपणे विठ्ठलाची आळवणी केली.

विठ्ठलाने प्रकट होऊन नामदेवाला सांगितले,

"नामा, अरे तू अगदीच कसा गोंधळलास. ज्ञान आणि भक्ती यांच्या एकत्रित अभ्यासाशिवाय पूर्णता येत नसते. तुझी भक्ती मला मान्य झाली. मी तुझा झालो. तुला आपला म्हटलं. पण गुरूपदेश घेऊन तू पूर्णता प्राप्त करून घ्यावीस असं मलाही वाटतं!"

"तुलाही वाटतं तर बोलणंच खुंटलं. सांग कुठं जाऊ? कोणाला शरण जाऊ?" नामदेवांनी विचारले.

"आंवढ्याला नागनाथाच्या सेवेत विसोबा खेचर आहेत. त्यांना शरण जा. त्यांचा उपदेश घे. ते तुझ्या हिताचं आहे." देवाने नामदेवांना सुचविले.

त्याचवेळी इकडे विसोबांना आदेश मिळाला, "नामदेव येतोय. त्याला योग्य उपदेश कर!"—

या आदेशानेच विसोबांना जाग आली. देवाची स्वप्नात झालेली आज्ञा प्रत्यक्षात आणण्याची त्यांना घाई झालेली दिसत होती. विसोबांनी तातडीने नागनाथाचे देवालय गाठले—

याचवेळी एक परस्थ वाटसरू विसोबांच्या घराचा शोध घेत आला होता. डोईला मळलेले पागोटे, अंगावरचे कपडे धुळीने माखलेले, चेहरा घामेजलेला अशा अवस्थेत तो प्रवासी आला होता. विसोबांना भेटायला आलेल्या त्या प्रवाशाला कळले की विसोबा नागनाथाच्या देवळात भेटतील. त्यामुळे तो तिकडे गेला.

देवालयाच्या परिसरात येताच तो प्रवासी पुष्कळसा शांत झाला. त्याच्या हालचालीत आतापर्यंत दिसून येणारा घाबरेपणा, अस्वस्थपणा आता ओसरला होता. देवालयाच्या प्रांगणात येताच त्या प्रवाशाने प्रथम विहिरीकडे मोर्चा वळवला. पाणी निसून घेऊन त्याने हात-पाय-तोंड स्वच्छ धुतले; चुळा भरून टाकून, तो थोडेसे पाणी प्यायला. एवढे केल्याने त्याला आता खूप बरे वाटले. यानंतर तो देवालयाकडे निघाला. तेवढ्यात त्याच्या कानी हाक आली—

"अरे, नामदेव महाराज! आपण?"

ज्या दिशेने हाक आली त्या दिशेकडे पाहताच नामदेवाला एक वारकरी वेषातला गृहस्थ ओवरीतूच पुढे येताना दिसला. त्या

वारकऱ्याने "विठ्ठल! विठ्ठल!" म्हणत पाऊले टाकली आणि त्याने नामदेवांजवळ येताच दंडवत घातले.

"अहो, अहो! हे काय? मला कशाला दंडवत घालता?" नामदेवाने त्याला उठवत म्हटले.

"असं कसं! आपण म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलस्वरूपच!" त्या वारकऱ्याने नामदेवाचा गौरव करीत म्हटले.

"बरं महाराज ! मला गावीं पोचायला हवं आज, निघू मी?" असं म्हणून नामदेवांचा निरोप घेऊन तो वारकरी निघाला.

या क्षणभराच्या भेटीने नामदेवाला पुन्हा त्याच्या प्रिय विठ्ठलाचे स्मरण झाले. त्याच्या मनात अभिमानाने संचार केला. वारकऱ्यांमध्ये असलेला त्याचा सन्मान त्याच्या मनाला सुखावून गेला आणि त्याने आपल्याशीच म्हटले,

"विठ्ठला-पांडुरंगा! तुझ्यापासून दूर होताना खरं तर मन किती कष्टी झालं होतं. गुरूपदेशाबाबत भक्तश्रेष्ठांनी घेतलेल्या हट्टाचीही पर्वा मी एखाद्या वेळी केली नसती पण तुझीच आज्ञा झाल्यानं माझा नाइलाज झाला. तुझ्यापासून दूर होणं हे काम माझ्या जिवावर येतं रे! पण असो एथवर आलो. पुन्हा या वारकरी भक्ताच्या भेटीनं तुझी आठवण जागी झाली. आता इथली भेट लवकरात लवकर संपवून तुझ्याकडे धावत येईन!"

अशा विठ्ठलाच्या आणि आपल्या संबंधाच्या जाणिवा मनात आठवतच नामदेव शिवालयाच्या पायऱ्या चढला. त्याने प्रवेशद्वारापाशीच असलेल्या घंटेचा नाद केला. उंबऱ्याला स्पर्श करून तो हात कपाळी लावला. मग तो सभामंडपात आला.

आता नामदेव गाभाऱ्याच्या जवळ येऊन पोचला होता.

बाहेरच्या मंडपात त्याला विसोबा दिसले नाहीत. आश्चर्य करीत तो गाभाऱ्यापाशी उभा असतानाच त्याचे डोळे विस्फारले गेले. त्याच्या तोंडाचा 'आ' वासला गेला. त्याने पायांना गती दिली. तो तावातावाने गाभाऱ्यात शिरला.

तिथे दिसलेले दृश्य पाहणे नामदेवाला असह्य झाले.

नागनाथाचे देवालय म्हणजे प्रत्यक्ष कैलासनाथ शंकराचे स्थान! शंकर हा जितका भोळा तितकाच कोपिष्ट देव! आणि अशा शंकराच्या देवस्थानात हे असले घोर धाडस करणारा हा कोण?

समयांच्या मंद प्रकाशात नागनाथाच्या पिंडीची पूजा कशी शोभिवंत दिसत होती. काळ्याशार साळुंकेवरील त्रिपुंड्र चकाकत होता. फुले आणि बेलाची पाने वाहिलेली दिसत होती. खालच्या खोलगट भागात साठलेले दूध-पाणी अजून तिथेच रेंगाळत होते. शेजारी पुजेचे तबक तसेच पडलेले होते. आणि–

आणि अशा पूजनीय सांबाच्या पिंडीवर तेलाने माखलेल्या वाहणांसकट पाय टाकून एक जख्ख म्हातारा माणूस, मिटल्या डोळ्यांनी झोपलेला होता–?–?

'पूजा करता करताच याला काही झाले का?'

नामदेवाच्या मनात विचार आला. 'पण छेः! हा पूजेसाठी आला असता तर याच्या पायात वाहणा कशा असत्या?–? मग,– मग हा कसल्या तिरमिरीत येऊन तर इथे पडला नसेल?'

'छेः! तेही शक्य नाही. कारण, हा तर हात डोक्याखाली घेऊन अगदी निवांत झोपलेला दिसतोय.'

'कोण हा घोरकर्मा!'

नामदेवाचे मन क्षणाक्षणाला उद्विग्न होत चालले होते. त्याचा संयम सुटत चालला होता. गडबडलेले, गोंधळलेले मन सावरून नामदेव गाभाऱ्याच्या दारातूनच ओरडला,

"अहो--अहो ऽऽ! उठा! कोण आपण?"

त्या वृद्धाने नामदेवाच्या ओरडण्यामुळे डोळे थोडेसे किल-किले केले; तोंडाने एक हुंकार दिला; आणि पुन्हा तो होता तसाच स्वस्थ झोपून राहिला.

नामदेवाच्या सर्व संशयांचे निराकरण झाले होते. तो वृद्ध जिवंत होता. त्याला कोणताही अपघात झालेला नव्हता. मग हे काय? हा एकतर वाहणा घालून इथवर आला कसा? बरे आला तो आला, आणि असा देवावर पाय टाकून झोपला म्हणजे काय? नामदेवाला संताप आवरणे अशक्य झाले. त्याच तिरमिरीत नामदेव गाभाऱ्यात शिरला. त्याने खाली वाकून त्या वृद्धाला हलवले. त्यावर त्या वृद्धाने पुन्हा किलकिले डोळे करून नामदेवा-कडे पाहिले. थोडीशी हालचाल करण्याचा प्रयत्न केला पण त्या-वेळी तो इतका कण्हला की प्रत्यक्षात त्याच्याकडून काही हाल-चाल झालीच नाही. तेव्हा नामदेवाच्या लक्षात आले की याची अवस्था काही ठीक नाही.

"अहो! तुम्हाला बोलायला नि ऐकायला तरी येतंय का?" नामदेव त्या वृद्धाजवळ बसत म्हणाला.

"अं ऽऽ! काय बाबा?" तो वृद्ध बोलला.

"हे पाहा, आपण अशा स्थितीत इथे झोपला आहात की त्या पापाला क्षमा नाही." नामदेव.

"काय म्हणतोस काय बाबा तू? कोण रे तू?" तो वृद्ध

एवढेच शब्द बोलला पण तेवढ्या शब्दांसाठीही त्याला खूप कष्ट पडले.

"मी नामदेव. आपले नाव काय?" नामदेव त्या वृद्धाच्या वागण्याचा मनातल्या मनात अर्थ लावत होता. या वृद्धाला प्रत्यक्षाची जाणीव कशी द्यावी याचाही त्याचे मन विचार करीत होते. त्या वृद्धाकडे पहात नामदेवाने पुन्हा प्रश्न केला,

"अहो, आपले नाव तरी काय?"

"मी होय! विसोबा म्हणतात मला!" त्या वृद्ध गृहस्थाने उत्तर दिले.

"विसोबा? विसोबा खेचर नव्हे ना?" नामदेव उत्सुकतेने विचारत होता.

"होय मीच! मलाच विसोबा खेचरही म्हणतात." तो वृद्ध शांत, निर्विकार वाणीने बोलला.

"काय? आपण विसोबा खेचर?" नामदेवाचे डोके चक्रावल्यासारखे झाले. 'आपल्याला सर्वांनी गुरू म्हणून ज्यांना शरण जावयास सांगितले तेच हे विसोबा? यांना आपण गुरू म्हणून शरण जायचे? पांडुरंग! पांडुरंग! ज्याला देवावर पाय ठेवू नयेत एवढेही कळत नाही त्यांना नामदेवाने गुरू मानायचे! आपली थट्टा तर केली नसेल? पण जाऊ दे! आहे ती परिस्थिती तर बदलली पाहिजे.'

"विसोबा! आपण चुकून देवाच्या पिंडीवर पाय ठेवले असतील तर ते बाजूला घ्या." नामदेव म्हणाला.

"अं–हं! मला हलवतही नाही रे–! काय बरं तुझं नाव?" विसोबांनी पडल्या पडल्याच विचारले.

"मी नामदेव! पंढरपुराहून आलो होतो." नामदेव.

"नामदेवा! माझे पाय तेवढे देवाच्या पिंडीवरून दूर करून ठेवतोस का? माझ्यानं नाही रे हलवत! शिव हर–शिव हर!" विसोबांनी कण्हतच सूचना केली.

नामदेवाला स्फुरण आले. त्याने विसोबांचे पाय उचलले आणि पिंडीपासून दूर टेकवले–आणि काय आश्चर्य–पायाखाली



पिंडी! दुसरी जागा–दुसरी पिंडी! तिसरी जागा--तिसरी पिंडी एकामागून एक जागा बदलल्या तरी पायाखाली पिंडी असेच!

"हा काय प्रकार आहे? काहीतरी चमत्कार!" नामदेव काही एका आश्चर्याने म्हणाला.

"प्रकार! चमत्कार! नाही नामदेवा, तसले यात काहीच नाही." आता तो वृद्ध उठून बसला होता.

"मग या सर्वांचा अर्थ तरी काय लावायचा?" नामदेवाने प्रश्नांकित चेहरा करून विचारले.

"नामदेवा, सांगू तुला? एक तर–

**जळस्थळ आणि काष्ट की पाषाण ।**
**पिंडब्रह्मांड व्यापून अणूरेणू ॥**
**सर्वज्ञ साक्षीभूत हे जाणोनि पाही ।...**"

विसोबा आता नामदेवाला ज्ञान देण्याच्या ईर्षे बोलू लागले होते,

"नामदेवा, अरे '**देवावीण ठाव हे बोलणेचि वाव ।**' हे तुला आता तरी समजले ना!" विसोबांच्या शब्दाशब्दात आता समजावणी, प्रेमळपणा आणि ज्ञानदृष्टी यांचा अनुभव नामदेवाला मिळत होता.

आता नामदेवाला गुरूपदेशाची महती जाणवू लागली होती. आपल्याशी देव बोलतो, आपण भक्तीच्या सामर्थ्याने देवाला अंकित केला आहे, आपण देवाला पूर्ण ओळखून आहोत अशा तऱ्हेची नामदेवाला झालेली अहंकाराची बाधा कमी होत चालली होती. त्याने विसोबांचे पाय धरले. त्या चरणस्पर्शाबरोबरच नामदेवाचा अहंकार गळून पडला. त्याच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. एकप्रकारे भयभीत अशा अवस्थेत तो विसोबांच्या जवळ बसून राहिला. नामदेवाला फक्त एवढीच जाणीव होत होती की आपल्या अंतरंगातले काहीतरी बाहेर पडते आहे आणि नवे काहीतरी प्रवेश करते आहे.

नामदेव यावेळी विठ्ठलाचे ते शब्दच पुटपुटत होता–

"गुरूवाचुनी कैचा मुक्तिठाव।"

आणि एकाएकी नामदेवाच्या ठिकाणी ज्ञान स्फुरले. 'सर्वठायी परमेश्वराचे अस्तित्व आहेच!' हा अलौकिक सिद्धान्त त्याला या चमत्कारातून समजला.

मग काय? विसोबांचे म्हातारपण, त्यांचे वागणे, त्यांचे बोलणे या सर्वांमागे असलेली किमया त्याने सहज ओळखली.

यानंतर विसोबांनी नामदेवाला उपदेश केला. देवाचा सहवास नित्य लाभला तरी देवविषयक कल्पना तात्त्विकदृष्टचा समजली असे होत नाही. त्यासाठी गुरूकडून उपदेशच घ्यावा लागतो. नामदेवाची अडचण हीच होती.

"गुरुदेव, आपण प्रत्यक्ष देवस्वरूपच आहात. आपण माझ्यावर अनुग्रह करावा." नामदेव विसोबांपुढे शरणागताच्या भावनेने बोलू लागला. त्यावर लगेच विसोबा म्हणाले,

"नामदेवा! अरे एवढा दीनवाणा का होतोस? देवावरची तुझी श्रद्धा सर्वमान्य आहे. मीही ती जाणतोच. पण एवढंच काही पुरत नाही."

"आपण खूप बोला गुरुदेव–" नामदेव म्हणाला.

"बोलतो ना. अरे तेच तर माझ्याकडे आलेलं काम आहे. नामदेवा, तू इथे आलास तेव्हा तुझ्या मनात मी, माझे किंवा माझी भक्ती, माझा देव अशा तऱ्हेच्या विचारांची गर्दी होती. पण असं पाहा,

"तुझे निजसुख तुजपाशी आहे।
विचारूनी पाहे मनाम
विवेक वैराग्य शोधुनि

BVBK-0400907